गुंतवणूकदारांसाठी सुवर्ण संधी
महावीर पेन्शन ठेव योजना
1 लाख रुपये गुंतवणुक एक वर्षासाठी करा व मिळवा
दरमहा 833/- रुपये व्याज*
दि जैन मर्चन्टस् को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि.
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ, कापड बाजार, अ.नगर. फोन नं. : 0241-2993900
श्री. संजय काठेड (संस्थापक) Mo. 9372444001

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
मे. हरी बाकाजी देडगांवकर
Since 1935
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शनिवार दि. ११.०५.२०२४ | अंक नं. ०५९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020




# नावनोंदणी करूनही यादीत नाव न आल्याने हजारो मतदार राहणार मतदानापासून वंचित

## याद्यांमध्ये सावळागोंधळ, सुदृढ मतदारांचा अंध, अपंग उल्लेख, मयताची नावेही अनेक वर्षापासून कायम

नगर – लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी जिल्हा प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे चित्र एकिकडे उभे केले जात असले तरी त्याचवेळी मतदार याद्यांमधील सावळ्या गोंधळामुळे अनेक मतदारांना यावेळी मतदानाच्या हक्कापासून वंचित रहावे लागण्याची शक्यता आहे. ज्या नवमतदारांनी नावनोंदणी केली, अशा अनेक मतदारांची नावे यादीत आलेली नाहीत, तर काही सुदृढ मतदारांचा उल्लेख अंध, अपंग करण्यात आला असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे हजारो मतदारांना यावेळी त्यांच्या हक्कापासून वंचित रहावे लागणार असल्याचे दिसते.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नवीन मतदार नोंदणी, नावात दुरुस्ती, दुबार नावे वगळणे, मयताची नावे रद्द करणे यासाठी वर्षभरात अनेक विशेष मोहिमा राबविल्या जातात. मात्र या मोहिमांमध्ये मतदारांनी केलेली नोंदणी, सुचविलेले बदल आणि त्यासाठी भरून दिलेले विविध फॉर्म व्यवस्थितरित्या हाताळले जात नसल्याने मतदारयाद्यांमध्ये सावळा गोंधळ निर्माण होतो. यावेळीही असाच प्रकार अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघाच्या यादीतून समोर आला आहे.

१८ वर्षावरील अनेक तरुण-तरुणींनी मतदानासाठी यावेळी नावनोंदणी केली होती. त्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज भरून ते महापालिकेने नेमलेल्या बीएलओमार्फत जिल्हा निवडणूक शाखेकडे देण्यात आले. या नवमतदारांना मतदानाचा हक्क मिळेल अशी अपेक्षा होती. मात्र अशी नावनोंदणी करणाऱ्या अनेक नवमतदारांची नावे यादीत आलेलीच नाहीत. मतदान अवघ्या दोन-तीन दिवसांवर येऊन ठेपले असताना हा प्रकार उजेडात आला आहे. ज्यांची नावे नोंदणी करूनही यादीत आलेली नाहीत त्यांना यावेळी मतदानाच्या हक्कापासून वंचित रहावे लागणार हे आता निश्चित आहे. अशा नवमतदारांची शहरातील संख्या हजारोंच्या संख्येत असल्याचे सांगण्यात येत आहे.

त्याचबरोबर मतदार याद्यांमधील अनेक घोळ समोर येत आहेत. मयत मतदारांच्या वारसांनी मृत्यूचा दाखला आणि इतर आवश्यक कागदपत्रे सादर करूनही मयताचे नाव यादीतून कमी करण्यात न आल्याचे प्रकारही समोर येत आहेत. त्याचबरोबर जे मतदार सुदृढ आहेत त्यांचा अंध, अपंग असा उल्लेख यादीत आला आहे. त्यामुळे निवडणूक आयोग आणि प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराबाबत मतदारांमधून संताप व्यक्त होत आहे. महापालिकास्तरावर निवडणुकीचे काम पाहणारे अधिकारी-कर्मचारी यांनी आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडले तरी जिल्हा निवडणूक शाखा आणि जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या हेकेखोर कारभारामुळे मनपाच्या कर्मचाऱ्यांना जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. खालच्या कर्मचाऱ्यांनी कितीही चांगले काम केले तरी वरिष्ठ अधिकारी त्याबाबत दखल घेत नसल्याने मतदार याद्यांमध्ये सावळागोंधळ निर्माण होतो. प्रशासकीय पातळीवरील समन्वयाचा अभाव, अधिकारी-कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा यामुळे यावेळी हजारो नवमतदारांना मतदानापासून वंचित रहावे लागणार असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

# नागरिकांनी कुटुंबियांसह मतदानाचा हक्क बजवावा

नगर – ३७ अहमदनगर लोकसभा मतदार संघासाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. सर्वांना सुलभतेने मतदान करता येणे शक्य व्हावे, याकरीता महाराष्ट्र शासनाने १३ मे रोजी सुट्टी जाहिर केलेली आहे.

महानगरपालिका हद्दीतील सर्व मतदारांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १३ मे रोजी मतदान करून मतदानाचा हक्क बजाविण्यात यावा व राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यात यावे.

मतदान केल्यानंतर महानगरपालिका स्वीप व्हॉटसअॅप क्रमांक ९१७५६७५२३२ वर मतदान केल्यानंतरचे डाव्या हाताच्या बोटास लावण्यात आलेली शाई सह फोटो आपल्या नांवासह टाकण्यात यावेत. सदर फोटोमधुन लकी ड्रॉ काढण्यात येणार असुन लकी ड्रॉ मधील भाग्यवंत मतदारास अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने आकर्षक बक्षिस व सन्मानपत्र प्रदान करण्यात येणार आहे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक डॉ. पंकज जावळे यांनी केले आहे.

आरीवर्कचे सर्व साहित्य होलसेल भावात मिळेल.
* रिंग, आरी स्टॅण्ड, मोती, कुंदन, स्टोन चेन इ,.
नथ मेकींग साहित्य मिळेल.
संपर्क : कांतीलाल साकळचंद
गंज बाजार, अ.नगर
9890299890

Jivan Jyoti Medical Foundation`s
Kiddy Land
Pre Primary School
PLAY GROUP
NURSERY
L.K.G
U.K.G
Educating Students For a Better & Bright Future
Admission Open For 2024 - 2025
For More Details Contact 8830685732 9373560452
Opp.Bombay Bakers / Bombay Hospital Bldg., Behind Forest Office, Nagar-Aurangabad Road, Ahmednagar
Email : kiddylandpreprimary@gmail.com
Website : www.jjmf.info



## रस्त्याच्या मध्यभागी विद्युत खांबाच्या रूपात 'यमदूत'

रस्ते रुंदीकरण आणि कॉंक्रिटीकरण करताना रस्त्यांच्यामध्ये येणाऱ्या वीज खांबामुळे वाहतुकीला अडथळा तर होतोच पण अपघाताला निमंत्रणही मिळते. अशा अनेक घटना शहरात घडल्या आहे. तरीही ठोस पावले उचलली जात नाही. उलट खांब न काढताच रस्त्यावरील वाहतूक सुरू केली जाते. शहरातील सावेडी उपनगरातील पारिजात चौक ते टेलिफोन ऑफिस ते नवीन जिल्हाधिकारी रोड/समतानगर रोड वर धोकादायक अवस्थेत विद्युत खांब उभा आहे. अश्या प्रकारचे खांब हटण्याची जबाबदारी महापालिका व महावितरण या दोघांची आहे त्यासाठी लागणारा खर्च दोघांनी उचलायचा आहे. पण अजूनही ही कामे शहरात पूर्ण झालेली नाहीत महापालिका व महावितरण यांनी शहरातील धोकादायक अवस्थेत उभे असणाऱ्या विजेच्या खांबाचे सर्वेक्षण करून सदर खांब रस्त्याच्या कडेला स्थलांतरित करण्याची कार्यवाही करावी अशी मागणी नागरिक करत आहेत. (छाया – महावीर पोखरणा)

# विवाहसोहळ्यातून नवरीच्या दागिन्यांसह रोकडची चोरी

नगर – विवाह सोहळ्यात नवरी मुलीला घालण्यासाठी केलेले सोन्या चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम व मोबाईल असा ऐवज ठेवलेली पर्स अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील शिरढोण येथे घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आसराबाई रघुनाथ मेहेत्रे (रा.अकोळनेर, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या निवृत्त शिक्षिका असून त्यांच्या भावाच्या मुलाचे लग्न २ मे रोजी नगर तालुक्यातील शिरढोण येथे होते. त्यानिमित्त त्या शिरढोण येथे गेल्या होत्या. विवाह सोहळ्यात नवरी मुलीला घालण्यासाठी नवरदेव यांच्या कुटुंबाने सोन्या चांदीचे दागिने केलेले होते. ते सांभाळण्यासाठी फिर्यादी मेहेत्रे यांच्या कडे देण्यात आलेले होते. त्यांनी सोन्याचे गंठन, कानातील टॉप्स, पायातील चांदीचे जोडवे तसेच काही रोख रक्कम व मोबाईल असा २ लाख १९ हजार ३१० रुपयांचा ऐवज त्यांच्या जवळील पर्स मध्ये ठेवलेले होते. दुपारी २ च्या सुमारास मंगलकार्यालयात विवाह सोहळ्याची गडबड सुरु असताना अज्ञात चोरट्याने त्यांची नजर चुकवून ती पर्स चोरली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. त्यांनी शुक्रवारी (दि.१०) सायंकाळी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रणजीत मारग हे करीत आहेत.

कापडबाजार, मोची गल्ली, अ.नगर येथे...
७,५०० मध्ये रेन्टने शॉप उपलब्ध..
एकाच ठिकाणी लेडीज अॅक्सेसरीजमध्ये सर्वकाही...
* ऑफर मर्यादित कालावधीसाठी * सर्व सुविधांयुक्त * सी.सी.टिव्ही. कॅमेरे
* पिण्याच्या पाण्याची सोय तसेच वॉशरुमची सुविधा
अशा व्यवसायाची सुवर्ण संधी पुन्हा नाही...
– अधिक माहितीसाठी संपर्क –
9270570699

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा पंधरा दिवसात बसवणार

## महापालिकेचे छावा मराठा संघटनेला लेखी आश्वासन; आंदोलन मागे


नगर – धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या १४ मे जयंतीच्या दिवशी प्रोफेसर चौकात पुतळा बसवण्याच्या मागणीसाठी अनेक पत्रव्यवहार करून देखील अद्यापही कारवाई करण्यात आलेली नसल्याने छावा संघटनेच्या वतीने अहमदनगर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले. १४ मे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुतळा बसवण्यात यावा अन्यथा प्रोफेसर चौकामध्ये ११ मे पासून उपोषण सुरू करणार असल्याचे निवेदन देण्यात आले होते या मागणीची दखल घेत महानगरपालिका शहर अभियंता मनोज पारखे यांनी लेखी पत्र दिले. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्ण कृती पुतळा बसवण्यासाठी चौथ्याऱ्याचे काम येथे पंधरा दिवसात पूर्ण करून पुतळा बसविण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन दिले.



धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा पंधरा दिवसात बसविण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन छावा मराठा युवा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना देताना मनपाचे शहर अभियंता मनोज पारखे.

यावेळी छावा संघटनेच्या महिला जिल्हा अध्यक्ष सुरेखाताई सांगळे, शिवप्रतिष्ठान जिल्हा अध्यक्ष बापू ठाणगे, दत्ता वामन, विश्व वारकरी परिषदेचे साहेबराव पाचरणे, केशव बरकते, महेश चव्हाण, दीपक गहिले, योगेश पवार, किरण उंडे, सुनील ठाकरे, संतोष शिरसाठ आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, छावा संघटनेच्या वतीने प्रधान सचिव नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांना २ मे २०२२ रोजी व २३ जून २०२२ रोजी पालकमंत्री यांना १ मे २०२३ रोजी ना हरकत मिळण्याबाबत पत्रव्यवहार केला असून त्यांचा पाठपुरावा केला आहे. अप्पर मुख्य सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांना २ मे २०२२ व २३ जून २०२२ रोजी पत्र देऊन सदर विभागाची ना हरकत आलेली असून वर्क ऑर्डर झालेली आहे. काम चालू असून छत्रपती संभाजी राजे जयंती पूर्वी लवकरात लवकर पुतळा बसवण्यात यावा अन्यथा प्रोफेसर चौक अहमदनगर येथे अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले होते याची दखल घेत मनपाने लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले आहे.

स्मृतिगंध
आपल्या चरणी लीन होवो
माथा आमुचा,
नको कोणती आसक्ती,
मनाच्या गाभाऱ्यात वसावी
सदैव आपली दिव्य मुर्ती..

स्व. नेमीचंदजी मुनोत
(नेवासकर)
।। आपल्या पावन स्मृतिस विनम्र आदरांजली ।।
केशरगुलाब मुनोत परिवार
(नेवासकर)
आडत बाजार, अ.नगर.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## मतदान कराच... अधिकार व कर्तव्यसुद्धा

लोकशाही ही लोकांच्या मतदानावर अवलंबून आहे. लोक ठरवतात त्यांच्या प्रतिनिधींना. लोकशाही व्यवस्थेत मतदानाचा अधिकार योग्य व चांगली राज्यकर्ते सत्तेवर आणण्यास व गरज पडल्यास परिवर्तनाचा सर्वोत्तम मार्ग आहे. म्हणूनच मतदान हा केवळ हक्कच नसून ते कर्तव्यही मानले पाहिजे.

देशाची दशा-दिशा समजून घेऊन मतदारांनी जागरुक राहून मतदान करणे हाच समाज अन् देशाची भावी दिशा निश्चित करण्याचा मार्ग आहे. या निवडणुकीत ३ टप्पे पूर्ण झालेत. मतदानाचा टक्का घसरतोय ही चिंतेची बाब बनतेय.




देशाच्या भवितव्याचा, एकूण सर्व परिस्थितीचा विचार करून मतदान करायला पाहिजे. २/४ दिवस अगोदर आपले मतदान यादीतले नाव, मतदानाचे ठिकाण पाहून ठेवायला पाहिजे. प्रत्येक पक्षाच्या कार्यकर्त्यांने बूथ नियोजन करतांना वयस्कर मतदारांना सहकार्य करून मतदान केंद्रावर आणावे. भारतीय लोकशाही जगातील सर्वात मोठी आणि शक्तिशाली आहे. तिचा सन्मान वाढवून देशाची किर्ती व प्रगती करण्यासाठी मतदान हे एकमेव अस्त्र/शस्त्र मतदारांकडे आहे. त्याचा सदुपयोग करून योग्य प्रतिनिधी निवडून देशाला समृद्ध करणे यातच आपले हित सामावले आहे.



# आता जर पुन्हा नरेंद्र मोदी सरकारला निवडून दिले तर जगातील लोक 'महामूर्खांचा देश' म्हणून ओळखतील

### आपल्या सोयीनुसार विखे पाटील घराणे हे धर्मांध शक्ती बरोबर गेले असल्याने त्यांचा पराभव करणे गरजेचे : डॉ.विश्वंभर चौधरी


निर्भय बनो व सकल भारतीय समाजाच्यावतीने डॉ. विश्वंभर चौधरी, ॲड. असिम सरोदे, ॲड. निशा शिवूरकर यांचे माऊली सभागृह येथे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

नगर - देशातील सध्याचे वातावरण हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक असून, सर्वसामान्यांचा आवाज दाबला जात आहे. खरा इतिहास मिटवून खोटेपणाने नवा इतिहास मांडला जात आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात मुस्लिम लीग व हिंदू महासभेने एकत्रपणे युती करत पश्चिम बंगालमध्ये सरकार बनवले. कट्टर धर्मांधपणा हीच यांची विचारसरणी असून त्यांचे देश प्रेम हे बेगडी आहे. प्रसारमाध्यमे विकत घ्यायची, त्यांच्यावर दडपण आणायचे व तरी ते आपली चाकरी करत नसतील तर थेट मालकच बदलून टाकायचे, अशा पद्धतीने मोदी व शहा यांनी देशातील प्रसिद्धीमाध्यमे काबीज केली. अहमदनगरमध्ये अनेक वर्ष मुस्लिमांचे राज्य होते म्हणून इथे काय सगळेच मुस्लिम झाले काय? अनेक वर्ष या शहरात सर्वधर्मीय अगदी आनंदाने राहत होते. खरी गडबड धर्मांध लोकांनी हिंदू-मुसलमान जेव्हापासून सुरू केले, तेव्हापासून झाली. आपल्या सोयीनुसार विखे पाटील घराणे हे धर्मांध शक्ती बरोबर गेले असल्याने त्यांचा पराभव करणे गरजेचे आहे. लोकशाही वाचवण्याचे आव्हान सुजाण नागरिकांसमोर आहे. हे आव्हान जर स्वीकारले नाही तर पुढची पिढी आपणास कद्यापिही माफ करणार नाही. यासाठीच नागरिकांनी निर्भय होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. विश्वंभर चौधरी यांनी केले.

निर्भय बनो व सकल भारतीय समाजाच्यावतीने डॉ. विश्वंभर चौधरी, ॲड.आसिम सरोदे, ॲड.निशा शिवूरकर यांचे माऊली सभागृह येथे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

यावेळी ॲड. असीम सरोदे म्हणाले की, राज्यघटनेची पायमल्ली होत आहे. निवडणूक आयोग, ईडी, सीबीआय या नरेंद्र मोदी व अमित शहा च्या तालावर नाचत आहे. संस्था आणि व्यक्ती दबावात असून, न्यायव्यवस्थाही याला अपवाद नाही. काही न्यायाधीश हे सरकारच्या तालावर नाचत आहेत. लोकांना मतदान करण्याचासुद्धा अधिकार नाकारला जात असल्याचे इंदोर सुरत येथे दिसले. नोटाचा सुद्धा अधिकार सरकार हिरावून घेऊ पाहतो. चंदीगड येथे तर सत्तेच्या हव्यासापोटी लोकांच्या मतांचासुद्धा त्यात हेरफेर करून अनादर करण्यात आला. नोटबंदी, इलेक्ट्रोलर बॉण्ड, पीएमके केअर फंड असे अनेक महाघोटाळे देशात मोदी सरकारने केले. मोदी व शहा यांची हुकूमशाही राजवट संपविण्याची हीच योग्य वेळ आहे. कोणत्याही धर्माचा धर्मांधपणा हा लोकशाहीसाठी मारक असून कट्टर हिंदूत्व किंवा कट्टर मुस्लिम अथवा इतर कोणत्या धर्माचा कट्टरपणा देशासाठी घातक असून, यामुळे फाळणीशिवाय काहीही हातात येऊ शकत नाही. केवळ झेंडे लावून भारतावर प्रेम करायचे हे साफ चुकीचे आहे. भारतावर प्रेम करायचे असेल तर भारतातील प्रत्येक माणसावर तुम्हाला प्रेम करावे लागेल. देवेंद्र फडणवीस या माणसाने महाराष्ट्रातले राजकारण नासवले. महाराष्ट्रात एकदम अनपड असलेले व शाळेची कधीही पायरी न चढलेले गाडगे महाराजांनी दाखवून दिले आहे की, शाळेच्या शिक्षणाचा आणि चांगल्या वागणुकीचा संबंध नाही. शिक्षणाचा संबंध जर तात्विक विचार करण्याशी नसेल तर केवळ सुशिक्षित असून उपयोग नाही, असा टोला त्यांनी सुजय विखे यांना मारला. सुजय विखे हे खोटारडेपणाची भूमिका घेत आहे. एका महाखोटारड्या माणसाबरोबर राहिल्याने त्यांनी मतदारांची माफी मागावी.

अध्यक्षीय भाषणात मनोगत व्यक्त करताना ॲड. निशा शिवुरकर म्हणाल्या की, महागाईचा प्रचंड आगडोंब उसळला आहे. कामगार कायद्यांमध्ये बदल करून कामगारांना देशोधडीला लावले आहे. शेतकरी रस्त्यावर आंदोलन करत असताना व ७७० शेतकरी शहीद झाले असतानाही जर त्यांच्या बाजूने संसदेत खासदार आवाज उठवणार नसतील तर ते नुसतेच सुशिक्षित असून काय उपयोग?. भारतीय जनता पार्टी ही बलात्कारी लोकांना अभय देणारी पार्टी आहे. त्यामुळे या केंद्र सरकारला सत्तेतून खाली खेचणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात ॲड. श्याम आसावा म्हणाले, १० वर्षात केवळ मागच्या सरकारांनी काय केले हे सांगण्यात घालवले. शहरांचे नाव बदलल्याने लोकांचे चालचरित्र, वागणूक बदलणार आहे का, हा मोठा प्रश्न आहे. २५०० पेक्षा जास्त महिलांचे लैगिंग शोषण करणारा प्रज्वल कुमार यास केवळ तो हिंदू असल्याने तथाकथित हिंदुत्वच्या प्रेमापोटी पाठीशी घातले. त्याच्याऐवजी जर एखादा मुस्लिम असता तर त्याला तुडवून काढले असते.

सभेची सुरुवात संध्या मेढे यांनी संविधान वाचनाने केली. आभार प्रदर्शन भैरवनाथ वाकळे यांनी केले. कार्यक्रमात आनंद शितोळे यांनी लिहिलेल्या पाच पुस्तकांचे हस्ते करण्यात आले.

सदर पुस्तकांबाबत मनोगत व्यक्त करताना लेखक आनंद शितोळे यांनी लोकांपर्यंत सरकारचा कारभार पोहोचत नसून आज माध्यमे सरकारच्या हातातील बाहुले बनल्याने लोकांपर्यंत खोटा व दिशाभूल करणारा प्रचार केंद्र सरकार करत असल्याने सत्य लोकांपर्यंत जाणे गरजेचे आहे व त्याकरता या पुस्तकांचे लिखाण करण्यात आलेले आहे असे सांगितले.

यावेळी डॉक्टर विश्वंभर चौधरी यांचा सन्मान करून स्वागत अशोक सब्बन यांनी केले, ॲड. असीम सरोदे यांचा सन्मान युनूस तांबटकर यांनी तर ॲड. निशा शिवुरकर यांचा सन्मान ॲड. संतोष गायकवाड यांनी केला. सभा यशस्वीतेसाठी संध्या मेढे, अशोक सब्बन, युनूस तांबटकर, आबिद शेख, भैरवनाथ वाकळे, ॲड. संतोष गायकवाड, अहमदनगर निर्भय चळवळीचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.


मनपा कामगार युनियनच्यावतीने मतदान जनजागृती करण्यात आली. (छाया - लहू दळवी)

## महापालिका कामगार करणार १०० टक्के मतदान

### बाबासाहेब मुदगल यांचे प्रतिपादन; कामगार युनियनच्या वतीने मतदान जनजागृती

नगर - लोकसभा निवडणूक प्रक्रिया सुरू असून अहमदनगर दक्षिण मतदार संघामध्ये जास्तीत जास्त मतदान घडावे यासाठी जिल्हाधिकारी व मनपा आयुक्त डॉ.पंकज जावळे यांच्या सुचनेनुसार अहमदनगर मनपा कामगार युनियनच्यावतीने कामगारांमध्ये जनजागृती करत, आपले कुटुंब व मित्रपरिवार यांनी १०० टक्के मतदान करण्याचा संकल्प केला आहे. आपल्याला संविधानाने दिलेला हक्क बजवायचा असून लोकशाही प्रक्रिया निर्भय बनवायची आहे, असे प्रतिपादन मनपा कामगार युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल यांनी केले.

केडगाव येथे लोकसभा निवडणुकीमध्ये अहमदनगर मनपा कामगार युनियनच्या वतीने कामगारांमध्ये मतदान जनजागृती केली जात आहे. यावेळी अध्यक्ष बाबासाहेब मुदगल, अध्यक्ष जितेंद्र सारसर, सरचिटणीस आनंद वायकर, नंदकुमार नेमाने, प्रकाश साठे, विजय कोतकर, महादेव कोतकर आदी उपस्थित होते.

सरचिटणीस आनंद वायकर म्हणाले की, संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेला मतदानाचा अधिकार बजावायचा आहे. युनियनच्या माध्यमातून कामगारांमध्ये जनजागृती करीत असून आज केडगाव येथे सफाई कामगारांना मतदानाबाबत माहिती दिली आहे. मतदान हे गुप्त करायचे असून ते कोणालाही करा त्या माध्यमातून चांगला लोकप्रतिनिधी निवडून येईल व कामगारांचे प्रश्न मार्गी लागले जातील. यासाठी मनपा कर्मचारी १०० टक्के मतदान करणार आहे. आयुक्त डॉ.पंकज जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात ७५ टक्के मतदान करण्यासाठी आम्ही काम करत आहोत असे ते म्हणाले.

लोकसभेचे १३ मे रोजी मतदान होत असून मनपा कर्मचाऱ्यांनी आपल्या कुटुंबासह मित्र परिवाराला शंभर टक्के मतदान करण्याचे आव्हान करावे व कर्मचाऱ्यांनी मतदान केल्यानंतर महापालिकेकडे घोषणापत्र भरून द्यावे असे आव्हान कामगार युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर यांनी केले.

## मतदान करा व विविध आरोग्य तपासणीसाठी ५०% सवलत मिळवा

नगर - देशात लोकशाहीचा उत्सव सुरू आहे. प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य समजून १०० टक्के मतदान करावे. यासाठी १३ ते १५ मे या कालावधीत मतदान केलेल्या व्यक्तींसाठी वेदांतनगर, सावेडी दत्त मंदिर जवळील, प्रिसिजन प्लस डायग्नोस्टिक्स सेंटर येथे सर्व प्रकारचे सोनोग्राफी, सिटीस्कॅन, हाडांची ठिसूळता तपासणी, डेक्झा स्कॅन विविध आरोग्य तपासणीसाठी ५०% सवलत देण्यात येणार आहे. तरी मतदान केल्याची बोटावरील निशाणी दाखवा व सवलत मिळवा, असे आवाहन प्रिसिजन प्लस डायग्नोस्टिक्स सेंटरचे डायरेक्टर डॉ.रणजीत सत्रे व सुशील नेमाने यांनी केले आहे.

## बाजारपेठेतून मोपेडची चोरी

नगर - नगर शहरातील बाजारपेठ भागात असलेल्या काटे गल्ली (अर्बन बँकेशेजारी) येथे लावलेली सुझुकी कंपनीची एक्सेस मोपेड (क्र. एम.एच.१६ सी यु ५९८०) अज्ञात चोरट्याने ८ मे रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या कालावधीत चोरून नेली आहे.

याबाबत कादिर यासीन शेख (रा. बूथ हॉस्पिटल शेजारी) यांनी शुक्रवारी (दि.१०) कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# नगर जिल्ह्यात लोकसभेसाठी ३७३४ केंद्रांवर मतदान प्रक्रिया

**नगरमध्ये १९ लाख ८१ हजार तर शिर्डीत १६ लाख ७७ हजार मतदार**

नगर - लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात नगर जिल्ह्यातील अहमदनगर दक्षिण व शिर्डी या दोन मतदार संघात सोमवारी (दि.१३) सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळात मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या साठी नगर दक्षिण मध्ये २०२६ तर शिर्डी मतदार संघात १७०८ अशी एकूण ३७३४ मतदान केंद्र असून नगर दक्षिण मध्ये १९ लाख ८१ हजार ८६६ तर शिर्डीत १६ लाख ७७ हजार ३३५ मतदार मतदार आहेत. यातील ८५ वर्ष वयापुढील तसेच दिव्यांग अशा नगर दक्षिण मध्ये ८२४ व शिर्डीत ८३४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. प्रशासनाने त्यांच्या घरी जावून ही प्रक्रिया पार पडलेली आहे.

नगर दक्षिण मतदार संघात २५ तर शिर्डीत २० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. शनिवारी (दि.११) सायंकाळी ५ वाजेपासून जाहीर प्रचार संपणार आहे. तर सोमवारी मतदान होणार असून जिल्हा प्रशासनाने त्यासाठीची सर्व प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. नगर दक्षिण मध्ये २०२६ मतदान केंद्रांवर ४०५२ बॅलेट युनिट, २०२६ कंट्रोल युनिट तर २०२६ व्हीव्हीपॅट असणार आहेत. शिर्डी मध्ये १७०८ मतदान केंद्रांवर ३४१६ बॅलेट युनिट, १७०८ कंट्रोल युनिट तर १७०८ व्हीव्हीपॅट असणार आहेत. शिर्डीत ४ तर नगर दक्षिण मध्ये १ मतदान केंद्र संवेदनशील घोषित करण्यात आलेले आहे.

नगर दक्षिणमध्ये १० लाख ३२ हजार ९४६ पुरुष मतदार, ९ लाख ४८ हजार ८०१ महिला मतदार तर ११९ तृतीयपंथी मतदार असे एकूण १९ लाख ८१ हजार ८६६ मतदार आहेत. शिर्डी मध्ये ८ लाख ६४ हजार ५७३ पुरुष मतदार, ८ लाख १२ हजार ६८४ महिला मतदार तर ७८ तृतीयपंथी मतदार असे एकूण १६ लाख ७७ हजार ३३५ मतदार आहेत.

चौथ्या टप्प्यातील दोन्ही मतदार संघातील प्रत्यक्ष मतदान प्रक्रीयेकरीता लागणारे साहित्य, साधनसामग्री मतदान केंद्रावर पुरवण्यात आलेली आहे. निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी पुरेसे प्रशिक्षित मतदार कर्मचारी व अधिकारी पुरविण्यात आले आहेत. तसेच पोलीस कर्मचारी तैनात ठेवण्यात आले आहे. मनुष्य बळाचे रॅन्डमाझेशन करुन त्यांच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या आहेत. मतदान केंद्रावर पुरवण्यात येणाऱ्या ईव्हीएम व व्हिव्हिपॅटची तपासणी पूर्ण झाली असून त्यांचेही रॅन्डमाझेशन झाले आहे.

## शनिवारी सायंकाळपासून मद्य विक्री बंद

अहमदनगर व शिर्डी लोकसभा मतदार संघाच्या सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेत कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांनी मतदान संपण्याच्या ४८ तास आधीपासून म्हणजे शनिवारी (दि.११) सायंकाळी ५ वाजेपासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत 'ड्राय डे' घोषित केला आहे. या शिवाय मतमोजणी च्या दिवशी ४ जूनरोजी संपूर्ण दिवस ड्राय डे आदेश लागू राहणार आहे.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ (सी) अन्वये व मुंबई दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम १४२ च्या अधिकाराचा वापर करून जिल्हाधिकाऱ्यांनी हा आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार अहमदनगर जिल्हा व जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या ५ किलोमीटर अंतरावर सर्व प्रकारचे देशी, विदेशी दारू विक्रीची दुकाने, परमिट रूम, बियरबार बंद राहणार आहेत.

आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या दुकाने परमिट रूम, बियर बारचा दारू विक्रीचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल, अशा इशाराही जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांनी दिला आहे.

## दिगंबर कुलकर्णी यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - दिगंबर जनार्दन कुलकर्णी (वय ७२) यांचे १० मे रोजी सकाळी अल्पशा आजाराने पुणे येथे निधन झाले. बँक ऑफ महाराष्ट्र येथुन ते सेवानिवृत्त झाले होते. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अ. नगर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सुन, मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## प्रयागबाई कुलकर्णी (करडगावकर) यांचे निधन



नगर - येथील श्रीमती प्रयागबाई जनार्दनराव कुलकर्णी (करडगावकर, वय ९४) यांचे ९ मे रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात मुले व नातवंड, पतवंड असा परिवार आहे.

## सीताबाई गाडगे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - नेप्ती (ता.नगर) येथील रहिवासी सीताबाई बाबुराव गाडगे (वय ९४) यांचे ११ मे रोजी सकाळी ८.४५ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नेप्ती गावच्या अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. कै. गंगाधर गाडगे, रंगनाथ गाडगे, राजेंद्र गाडगे यांच्या त्या मातोश्री होत.

### मयुर कॉस्मॅटिक्सच्या संचालिका
## सौ. विणा बंग यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील दाळमंडईत राहणाऱ्या मयुर कॉस्मॅटिक्सच्या संचालिका सौ. विणा श्यामसुंदर बंग (वय ५८) यांचे १० मे रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. ११ रोजी त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बाजारपेठेतील व्यापारी, मित्र परिवार, जनसमुदाय उपस्थित होता.

त्यांच्या पश्चात पती, १ मुलगा, १ मुलगी, मोठे दीर, भाऊजय, पुतणे असा परिवार आहे. मयुर बंग व कु. केसर बंग यांच्या त्या मातोश्री होत.



## ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक मालक संघटनेची नूतन कार्यकारणी जाहीर

लोकराज्य ऑटो रिक्षा चालक - मालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रामराजे शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ७ मे रोजी नगरमध्ये संघटना स्थापना करण्यात आली. नगर शहर जिल्हाध्यक्षपदी सुनिल ठाकरे व कार्याध्यक्ष मुकुंद लाखापती, नगर शहर जिल्हाध्यक्ष सुनिल ठाकरे, नगर शहर जिल्हा सरचिटणीस मच्छिंद्र शिंदे व इतर सदस्य यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष सिताराम खाकाळ आदींसह संघटनेचे कार्यकारणी सदस्य.




## अहमदनगर शहरामध्ये भीमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत हंडोरे यांचे स्वागत

अहमदनगर शहरामध्ये भीमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत हंडोरे हे आले असता त्यांचे स्वागत करताना भीमशक्तीचे शहर जिल्हा अध्यक्ष संजय जगताप समवेत बाळासाहेब घोरपडे, पोपटराव जाधव, सुबोध वाकचौरे, सुनील भिंगारदिवे, अशोक खंडागळे, अमोल काळकुंड, विलास भिंगारदिवे, विशाल भिंगारदिवे, अशोक सोनवणे, सचिन साबळे, अभय गायकवाड, अनिल काते, सुनील ठाकरे आदी पदाधिकारी उपस्थित होते

# लोकशाहीचा उत्सव साजरा करण्यासाठी जिल्हा वाचनालयाची व्यापक चळवळ

नगर - संपूर्ण देशभर मतदान लोकशाहीचा उत्सव साजरा होत असतांना काही तासांवर येऊन पोहचलेल्या अहमदनगर जिल्हा वाचनालयाने मतदान जागृतीसाठी व्यापक चळवळ उभी केली आहे. ७ ते १२ मे या कालावधीत विविध पातळीवर मतदानाचे महत्व व ते जास्तीत जास्त वाढविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा ग्रंथालय कार्यालय यांच्या समन्वयातून ही मोहिम राबविण्यात आली.



अहमदनगर जिल्हा वाचनालयाच्यावतीने वैशिष्ट्यपुर्ण कलाकृतीतून मतदार जागृती केली. (छाया - सुरेश मैड)

माध्यमे सातत्याने बदलत असतांना लोकशाही प्रक्रियेत मतदान महत्वपूर्ण असल्याचे विविध व्हिडिओ तयार करण्यात आले आहेत. वाचक, सभासद, बाल वाचक, सभासद, ज्येष्ठ सदस्य, युवा वर्ग, नगरमधील विविध कलाकार तसेच संचालक मंडळ यांनी या आपल्या वैशिष्ट्यपुर्ण कलाकृतीत विविध संदेशातून लोकशाहीचा हा उत्सव साजरा करण्यासाठी मतदारांना साद घातली. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॅटस्अप यांच्या माध्यमातून लाखो जनतेपर्यंत हा अनोखा प्रयोग घेऊन जाण्यात आला.

तसेच वाचकांना मतदानाची शपथ, माहिती पत्रकाचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रभाकर सुरकुटला, ज्ञानेश्वर वल्लाकट्टी, राजकुमार मुनोत, मनोज मुनोत, सखाराम गोरे, कवी चंद्रकांत पालवे, संचालक किरण आगरवाल, विक्रांत ठुबे, शिक्षिका मनिषा बोर्डे, कदम, सौ.घबाडे, ग्रंथपाल अमोल इथापे, सह.ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल, अभिनेते नितीन जावळे उपस्थित होते.

या उपक्रमासाठी जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरिष मोडक, संचालक मंडळ, वाचनालय कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# देशाची आर्थिक परिस्थिती गंभीर, कायदा आणि सुव्यवस्था मोडकळीस; भाजप सरकार सर्व आघाड्यांवर अपयशी, अनेक निर्णय नुकसानकारक

## लोकसभा निवडणूकीसाठी २०२४, स्वतंत्र भारत पक्षाची भूमिका

नगर – सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीत बाबत उच्चाधिकार समितीच्या बैठकीत शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाची भूमिका निश्चित करण्यात आली. भा.ज.पा., महा विकास आघाडी किंवा वंचित बहुजन आघाडी या प्रमुख आघड्यांपैकी कोणाला ही जाहीर पाठिंबा न देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

स्वतंत्र भारत पक्षाची स्थापना, एक स्वतंत्रता वादी विचाराचे सरकार भारतात स्थपित करून देशाची आर्थिक प्रगती घडावी व जनतेचे जीवनमान उंचवण्याच्या हेतूने झाली आहे. गेल्या सात दशके देशावर समाजवादी अर्थ व्यवस्थेचा प्रभाव राहिला असल्याने देशाची आर्थिक परिस्थिती गंभीर झाली आहे. कायदा आणि सुव्यवस्था मोडकळीस आली आहे. कोणताही विभाग भ्रष्टाचारा पासून मुक्त नाही व देशाची लोकसभा गुन्हेगारीची पर्श्वभुमी आसलेल्या व्यक्तींच्या कब्जात आहे.

स्वतंत्र भारत पक्षाने या पूर्वी अनेक वेळा, जनतेला मतदान करण्यास पर्याय असावा म्हणून निवडणुकीत उमेदवार उभे केले. काही निवडणुकीत त्या प्रसंगी असणाऱ्या परिस्थिती नुसार, इतर पक्षां बरोबर युती केली आहे. अनेक राजकीय पक्षांचे पर्याय तपासून पहिले पण आपल्याला दिलेली, अर्थव्यवस्थेत. बदल घडवण्याची व कर्जमुक्तीची आश्वासने पाळली गेलेली नाहीत.

सध्या स्पर्धेत असलेल्या सर्व पक्षांचे जाहीरनामे समाजवादी तोंडवळ्याचे, भिकवादाला प्रोत्साहन देणारे, सरकारी नियंत्रण वाढवणारे असल्यामुळे भ्रष्टाचाराला वाव देणारे आहेत. देशाला आर्थिक दृष्ट्या सक्षम करणारे धोरण कोणत्याच पक्षाकडे दिसत नाही. त्यामुळे जाहीर पाठिंबा देऊन एखाद्या पक्षाचा/ युतीचा, आघाडीचा प्रचार करावा अशी परिस्थिती नाही.

निवडणूक म्हटले की किमान कोणाला तरी मतदान तरी करावेच लागते. या वर्षी कोणाला मतदान करावे, या पेक्षा, कोणाला मतदान करू नये याचाच गांभीर्याने विचार करावा लागेल अशी परिस्थिती आहे.

सत्तेत असलेले भा.ज.पा. सरकार अनेक आघाड्यांवर अपयशी ठरल्याचे दिसत आहे. पुन्हा सत्तेत आल्यावर मागील दहा वर्षातील कार्यकाळात जी धोरणे राबविली गेली तीच अधिक कठोरपणे राबविली जाण्याची शक्यता आहे. भा. ज. पा. ने घेतलेले निर्णय बहुतेक जनतेला नुकसानकारक, त्रासदायक व अधोगतीकडे घेऊन जाणारे आहेत.

### शेती नुकसानीचा व्यवसाय शेतकरी कर्जाच्या खाईत

शेती व्यवसाय नियंत्रणमुक्त करण्या ऐवजी निर्यातबंदी, साठ्यांवर मर्यादा, वायदे बाजार बंदी, शेतीमाल आयती वगैरे सारखे उपाय योजून शेतीमालाचे भाव पडले आहेत. यामुळे शेती नुकसानीचा व्यवसाय झाला आहे व शेतकरी कर्जात बुडत चालला आहे. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्त करण्याऐवजी कठोरपणे कर्जवसुली करून शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास भाग पाडले जात आहे. उद्योगपतींचे मात्र लाखो कोटींचे कर्ज राईट ऑफ करून त्यांना थेटआर्थिक फायदा मिळवून देण्यात आला आहे.

शेतीसाठी वीज, पाणी, ग्रामीण रस्ते, साठवणूक व नाशिवंत शेतमाल वाहतुकीसाठी पुरेशी संरचना उभी करण्यात आली नाही. तसेच पीक विमा व नैसर्गिक आपत्तीत पुरेसा मोबदला किंवा संरक्षण देण्यात सरकार कुचकामी ठरले आहे. शेती क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यास दिरंगाई किंवा काही प्रमाणात मनाई ही शेतकऱ्यांच्या व देशाच्या आर्थिक विकासाला बाधा ठरली आहे.

शेती प्रश्नावर होणारी आंदोलने मोडून काढण्यासाठी अती टोकाची योजना करणे तसेच आंदोलकांवर क्रूर पद्धतीने कारवाई करणे हे जनतेचा न्याय मिळवण्याचा अधिकार संपुष्टात आणू शकते.

### पोलिस सत्ताधाऱ्यांचे बाटीक, न्यायालयेही दबावाखाली

लोकसभेतील जवळपास पन्नास टक्के खासदार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे, कलंकित आहेत. खून, बलात्कार, दरोड्या सारख्या आरोपाखाली गुन्हे दाखल असलेले सत्तेत मंत्री राहिले आहेत व पुन्हा निवडणुकीच्या रिंगणात आहेत. खून, बलात्कार सारख्या गुन्ह्यांना आवर घालता आलेला नाही. दिवसा ढवळ्या चौकात गोळ्या झाडून, भोकसून हत्या केल्या जात आहेत. खुनी, बलात्काऱ्यांना जामिनावर सोडले जात आहे, शिक्षा माफ केली जात आहेत व निरपराध लोकांवर खोटे गुन्हे दाखल करून तुरुंगात सडवले जात आहे. पोलीस यंत्रणा सत्ताधाऱ्यांची बटिक झाली असून विश्वासाहर्ता गमावून बसली आहे. न्यायालये सुद्धा दबावाखाली काम करत असल्याचे दिसून येत आहे.

महिला वर्ग जास्त असुरक्षित असल्याचे जाणवते. पदक विजेत्या कुस्तीगीर खेळाडूचा विनयभंग प्रकरण, खुनी व बलात्कारतील गुन्हेगारांची शीक्षा माफ करणे अशी अनेक प्रकरणे हे सिद्ध करतात.

### भरमसाठ करामुळे व्यापार उदीम अडचणीत

सरकारी खर्चात प्रचंड वाढ होत असल्या कारणाने अती कर आकरणी मुळे व्यापारी, उद्योजक व जनता त्रस्त आहे, परिणामी महागाई वाढत चालली आहे. देशात उद्योग उभे राहण्याची गती मंदावली असल्याने रोजगार निर्मिती नाही. बेरोजगारीचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. भरमसाठ कर आकारणी, अतिरेकी कामगार कायदे, स्थानिक गुंडा कडून हप्ता वसुली, इन्स्पेक्टर राज व सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचाराला कंटाळून मोठ्या कंपन्या भारतातील उद्योग बंद करत आहेत.

### सर्व जाती धर्मातील समभाव

मतदारांचे ध्रुवीकरण करण्यासाठी सतत हिंदू–मुस्लिम, मंदिर–मस्जिदसारखे मुद्दे उपस्थित करून जनतेत जाती किंवा धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे.

संविधानिक संस्थांची स्वायत्तता संपवणे गेल्या दहा वर्षात ई. डी, आयकर खाते, सेबी, सी.बी.आय, एन. आय. ए. सारख्या संस्थांचा राजकीय लाभासाठी सर्रास दुरुपयोग करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. निवडणूक आयोग नेमणूक, राज्यपाल सारख्या पदावर मर्जीतल्या व्यक्ती नेमून कारभारात हस्तक्षेप होत आहे.

### मोदींचे उदात्तीकरण म्हणजे हुकूमशाही निर्माणाची प्रक्रिया

राज्यातील सत्ता काबीज करण्यासाठी विरोधी पक्षातील आमदारांना, धमकावून, पैसे देऊन, भ्रष्टाचारावर पांघरूण घालून विरोधी पक्ष कमजोर केले जात आहेत. पक्ष फोडले जात आहेत. हे लोकशाहीला घातक आहे.

इलेक्ट्रॉल बाँडच्या रूपाने खंडणी वसूल करणे, विरोधी पक्षाचे बँक खाते गोठवणे, खोटे गुन्हे दाखल करणे, तुरुंगात डांबणे लोकशाही नसल्याचे संकेत आहेत. 'मोदी' यांचे उदात्तीकरण हे हुकूमशहा निर्माण करण्याची प्रक्रिया असल्याचे भासते.

हा पक्ष पुन्हा सत्तेत आला तर देशातील लोकशाही संपुष्टात येऊन हुकुमशाही निर्माण होण्याची शक्यता जास्त वाटते.

ईव्हीएमवर जनतेचा विश्वास नाही. ईव्हीएम ऐवजी मतदान पत्रिकेवर निवडणुका घेण्यास भाजपाचा विरोध हे मतदान यंत्रात गडबड असल्याची शंका बळावत आहे.

### भ्रष्टाचाऱ्यांना मिळते संरक्षण

भ्रष्टाचाराचे आरोप असलेले विरोधी पक्षातील नेत्यांना भाजपत घेऊन खटले बंद करणे व सत्तेत मंत्रिपद देणे हे धोरण भ्रष्टाचार विरोधी होऊ शकत नाही. या सरकारच्या कारकिर्दीत राफेल पासून चिक्की पर्यंत सर्व क्षेत्रात घोटाळेच घोटाळे आहेत. सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार होत असून जनता त्रस्त आहे. भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे व खुले आम होत आहे. सर्व नियम, कायदे गुंडाळून ठेवत मर्जीतल्या उद्योगपतींना मोठ्या प्रमाणात लाभ मिळवून दिला जात आहे व मोबदल्यात जनतेचे हजारो कोटी रुपये सत्तेतील नेते व शासकीय अधिकारी स्वतःच्या घशात घालत आहेत. सर्व शासकीय कार्यालयात लाच दिल्या शिवाय काम होत नाही त्यामुळे जनता हैराण आहे.

हे भाजपच्या कारकिर्दीतील ठळक मुद्दे आहेत. हेच सरकार ( मोदी सरकार) परत सत्तेत आल्यास देशाचे, जनतेचे व शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते तसेच आर्थिक व व्यक्ती स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य व प्रसार माध्यमांच्या स्वातंत्र्याचा सुद्धा अधिक संकोच होऊ शकतो. देश पुन्हा चुकीच्या लोकांच्या हातात देण्यात गंभीर धोका आहे म्हणून कोणत्याही परिस्थितीत भारतीय जनता पक्षाला सत्तेत पाठवण्यास विरोध व्हायला हवा.

### कोणालाही मत द्या भाजपला नको

तसे पाहिले तर सर्व प्रमुख पक्ष सारखेच आहेत. सत्ताधारी पक्षातील निम्म्यापेक्षा जास्त नेते काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना सारख्या पक्षातूनच आलेले आहेत. त्यामुळे सर्व पक्ष सारखेच झाले आहेत. भाजपाच्या विरोधातील महविकास आघाडीचा जाहीरनामा, त्यांची धोरणे ही काही वेगळी नाहीत व त्यांच्या कार्यकाळातील अनुभव ही काही वेगळे नाहीत. समाजवाद, भिकवाद, नोकरशाहीचे लांगूलचालन, भ्रष्टाचार वगैरे बाबतीत फारसा फरक नसल्यामुळे महाविकास आघाडीला किंवा वंचित बहुजन आघाडीला जाहीर पाठिंबा देता येणार नाही.

या निवडणुकीत भाजपचा पराभव होणे महत्वाचे आहे. पाशवी बहुमत तर अजिबात नको म्हणून कोणालाही मत द्या पण भाजपला मत देऊ नका हा संदेश जाणे गरजेचे आहे.

### लहान पक्ष किंवा अपक्षांना मतदान करावे

ज्या ठिकाणी स्वतंत्र भारत पक्षाचे उमेदवार असतील तेथे स्वभापच्या उमेदवारांना मतदान करणे. ज्या मतदार संघात महायुती व महा विकास आघाडी सोडून, चांगला, चारित्र्यवान, सामाजिक चळवळीत काम करत असलेला व जिंकण्याच्या स्पर्धेत असलेल्या इतर लहान पक्ष किंवा अपक्ष उमेदवारांना मतदान करावे.

### भाजप शेतकरी विरोधी पार्टी

भारतीय जनता पार्टी ही शेतकरी विरोधी पार्टी आहे म्हणून शेतकऱ्यांनी या पक्षाचा पराभव करण्याचा प्रयत्न करावा. भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालणारा पक्ष म्हणून सामान्य जनतेने मतदान करू नये. व्यापारात अतिरेकी हस्तक्षेप व अवास्तव कर आकारणी टाळण्यासाठी व्यापारी उद्योजकांनी भाजपा ला मतदान करू नये. रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार नही म्हणून सुशिक्षित तरुणांनी भाजपाला विरोध करावा, असे वर्धा येथे झालेल्या बैठकीत ठरविण्यात आले.

बैठकीला राजकीय निर्णय समितीचे माजी आमदार वामनराव चटप, माजी आमदार सरोजताई काशीकर, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, ललित बहाळे, स्व.भा. प चे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट व प्रदेशाध्यक्ष मधुसूदन हरणे उपस्थित होते.

---

## १३ मे रोजी सकल जैन समाज, राजस्थानी समाज, व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे मतदानाचा अधिकार बजवावा

**जैन मंदिराचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य सराफ सुवर्णकार फेडरेशनचे उपाध्यक्ष सुभाष मुथा यांचे आवाहन**


सुभाष मुथा

नगर – सध्या लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू आहे. देशाचे भवितव्य ठरवणारी ही निवडणूक असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी बसविण्याची संधी मतदारांना मिळाली आहे. अहमदनगर लोकसभा मतदारसंघात भाजपचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील आहेत. ते उच्च शिक्षित आणि विकासाचे व्हिजन असणारे आहेत. सकल जैन समाज, राजस्थानी समाज तसेच नगरमधील व्यापारी वर्गाने देशहित, समाजहित लक्षात घेता १३ मे रोजी आवर्जून मतदानाचा हक्क बजावत विकासासाठी भाजपला मतदान करावे, असे आवाहन कापडबाजार जैन मंदिराचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य सराफ सुवर्णकार फेडरेशनचे उपाध्यक्ष सुभाष मुथा यांनी केले आहे.

सुभाष मुथा म्हणाले की, लोकशाहीत मतदानाचा अधिकार हा सर्वात मोठा अधिकार आहे. योग्य लोकप्रतिनिधी निवडून देत आपण आपले भवितव्य घडवत असतो. नगर शहरात तसेच नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात जैन समाज मोठ्या प्रमाणावर आहे. नरेंद्र मोदी यांच्या अनेक धाडसी निर्णयांमुळे देशाची मान जगभरात उंचावली आहे.

जैन समाजाला अल्पसंख्याक दर्जा मिळाल्याने आपल्या समाजासाठी अनेक सवलती मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने दिल्या. त्यामुळे जैन समाजातील युवा वर्गाला लाभ होत आहे. देशातील काही पवित्र जैन तीर्थस्थळे गिळंकृत करण्याचा प्रयत्न काही समाजविघातक प्रवृत्तींनी चालवला आहे. त्याला पायबंद घालण्याची ताकद नरेंद्र मोदी यांच्याकडे आहे. ते निश्चितच आपल्या पवित्र जैन तीर्थस्थळांचा वारसा जतन करतील. त्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या पाठिशी आपली ताकद उभी करणे आपले कर्तव्यच आहे.

पद्मभूषण जैनाचार्य परमपूज्य रत्नसुंदर सुरीश्वरजी महाराजा साहेब हे कोविडच्या सुरुवातीला मुंबईत होते. तेव्हा नरेंद्र मोदी यांनी दूरध्वनीवरून त्यांच्याशी संपर्क साधून गोचरी पाण्याची (अन्नपाण्याची) व्यवस्था नीट आहे का? वैद्यकीय सुविधांची काही कमतरता नाही ना ? याची आवर्जून आपुलकीने विचारपूस केली होती. अयोध्या येथे जैन तीर्थक्षेत्र (मंदिर) साठी मोक्याच्या ठिकाणी ५ एकर जागा व तीर्थक्षेत्र, मंदिर उभारणीसाठी निधीही नरेंद्र मोदींनी दिला आहे. मुंबईतील किंग्ज सर्कल रेल्वे स्टेशनला जैन तीर्थंकर पार्श्वनाथ भगवान यांचे नाव देण्याचा निर्णयही पंतप्रधान मोदींनी घेतला.

साधूसाध्वीजी जेव्हा पायी अनवाणी विहार करतात तेव्हा त्यांना अनेकदा त्रास होतो, अपघात होतात. ही बाब लक्षात घेऊन भाजप सरकारने संपूर्ण देशभरात विहार करणाऱ्या साधूसाध्वीजींना पोलिस संरक्षण देण्याचे आदेश जारी केले. असे जैन समाजासाठी, जैन धर्मासाठी अनेक चांगले निर्णय मोदी सरकारच्या काळात झाले आहेत. अशी कामे यापूर्वी ६० वर्षाच्या काळात कोणत्याही इतर पक्षाच्या सरकारने केली नव्हती. त्यामुळे सध्या नरेंद्र मोदी यांच्याशिवाय देशाला अन्य पर्याय नाही. भाजप सरकारनेच केंद्रात जैन समाजाच्या खासदाराला मंत्रीपद देवून समाजाला न्याय दिला होता.

सध्या उन्हाचा कडाका वाढला आहे. त्यामुळे मतदानाच्या दिवशी सकाळीच सगळ्यांनीच आपल्या कुटुंबियांसह लवकर मतदानाचा हक्क बजावावा. नंतरच दुकाने उघडण्यासाठी जावे. दुपारनंतर उन्ह जास्त असल्याने मतदान केंद्रावर रांगेत उभे राहण्याचा त्रास टळू शकतो. सकाळीच आपले कर्तव्य बजावून नंतर उद्योग, व्यवसायाकडे वळावे असे आवाहन सुभाष मुथा यांनी केले आहे.

---

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हातात देशाचे भवितव्य सुरक्षित

**धनराज विसपुते यांचे प्रतिपादन; सुजय विखेंच्या प्रचारार्थ उद्या शिक्षक व पदवीधरांच्या जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन**

नगर – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षकांचा जिव्हाळ्याचा पेन्शनचा प्रश्न सोडवला आहे. २०१४ नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शिक्षण क्षेत्रल चालना देण्यासाठी देशात ३९० नवे विद्यापीठे, ७ नवीन आयआयटी आणि ७ नवीन आयआय एम स्थापन केले आहेत. तसेच देशात १५ अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान, नवे २२५ वैद्यकीय महाविद्यालयांची स्थापना त्यांनी केली आहे. प्रधानमंत्री श्री योजनेअंतर्गत १४ हजार पाचशे शाळांचा विकास त्यांनी केला आहे. विद्यार्थ्यांसाठी कर्ज वाढीव कर्ज योजना सुरु केली. देशात १ लाख स्टार्टअप्स सुरु केले. केवळ १० वर्षात नरेंद्र मोदी शिक्षकांचे व शिक्षण क्षेत्रातिल अनेक वर्षांपासूनचे प्रश्न व अडचणी सोडवल्या आहेत.

काँग्रेसने ७० वर्षांच्या राजवटीत काय विकास केला हे डोळ्यासमोर आहे. त्यांनी केवळ आजपर्यंत जनतेची दिशाभूल करण्याचेच काम केले आहे. लोकसभा पाठोपाठ आता नाशिक पदवीधर मतदार संघाचीही निवडणूक कालच जाहीर झाली आहे. या दोन्ही निवडणुका शिक्षकांच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणूक संपताच शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीसाठी शिक्षकांनी कटीबद्ध व्हावे, नरेंद्र मोदींच्या हातात देशाचे भवितव्य सुरक्षित आहे. त्यामुळे त्यांचे हात बळकट


भाजपच्या पदवीधर प्रकोष्टच्या आयोजित शिक्षक व पदवीधरांच्या जिल्हास्तरीय मेळाव्यात बोलताना पदवीधर प्रकोष्टचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते. समवेत अनंत देसाई, डॉ.प्रशम कोल्हे, प्रा.भानुदास बेरड, दामोदर बठेजा, युवराज पोटे, महेश नामदे, प्रिया जानवे आदी.

करण्यासाठी नगरमधून महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखेंना सर्व शिक्षकांनी मतदान करून विजयी करावे, असे आवाहन भाजपच्या पदवीधर प्रकोष्टचे प्रदेश संयोजक धनराज विसपुते यांनी केले.

सुजय विखे यांच्या प्रचारार्थ पदवीधर प्रकोष्ठच्या वतीने शिक्षक व पदवीधरांच्या जिल्हास्तरीय मेळाव्यात धनराज विसपुते बोलत होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे संचालक अनंत देसाई होते. यावेळी शिक्षक आघाडीचे प्रदेश संयोजक डॉ.प्रशम कोल्हे, प्रा.भानुदास बेरड, नगर शिक्षक प्रकोष्टचे जिल्हा संयोजक दामोदर बठेजा, युवराज पोटे, महेश नामदे, प्रिया जानवे, ॲड.अनिता दिघे, सुरेखा विद्ये आदींसह शिक्षक व पदवीधर नागरिक उपस्थित होते.

यावेळी प्रशम कोल्हे म्हणाले, काँग्रेसच्या राजवटीत कधीही शिक्षकांचे प्रश्न सुटले नाहीत तर अधिक वाढले होते. तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी विचित्र निर्णय घेत शिक्षण क्षेत्रावर काळरात्र आणली होती. मात्र भाजपच्या केंद्रातील व राज्यातील सरकारने शिक्षकांचे अनेक प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबरोबरच नव्या सुविधाही दिल्या आहेत.

यावेळी प्रा.भानुदास बेरड, अनिता दिघे, डॉ.सीमा कांबळे आदींची मनोगते झाली. प्रास्ताविकात मेळाव्याचे संयोजक दामोदर बठेजा यांनी महायुतीचे उमेदवार खा.डॉ. सुजय विखे व प्रदेश संयोजक धनराज विसपुते यांच्या कार्याचे कौतुक करून मेळाव्याच्या आयोजनामागची भूमिका व्यक्त केली. सूत्रसंचालन सीए ज्ञानेश्वर काळे यांनी केले. महेश नामदे यांनी आभार मानले. यावेळी सिंधी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष राम मेंघानी, ॲड. अच्युत पिंगळे, श्री. आचार्य, अशोक सचदेव उपस्थित होते.

---

# नरेंद्र मोदींचा विजयाचा रथ थांबवणे आता शक्य नाही

**केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले; महायुतीचे उमेदवार सुजय विखेच्या प्रचारार्थ मंगलगेट येथे सभा; मला नको आहे तुमचा फुलांचा बुके... मला हवा आहे नगरचा खासदार म्हणून सुजय विखे...**

नगर – लोकशाहीत प्रत्येक मताला खूप महत्व आहे. त्यामुळे प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजवावा. या लोकशाहीला कोणी धक्का लावला तर त्याची वाट लागेल असा धक्का आम्ही लावू. बाबासाहेबांनी देशाला दिलेले संविधान बदलण्याचा कोणताही विचार भाजपाचा व महायुतीचा नाहीये. संविधान बदलायचा अपप्रचार करून विरोधक जनतेची दिशाभूल करत आहेत. ७० वर्षात काँग्रेसने दलितांच्या मतनाचा केवळ वापर केला. पण दलितांसाठी काहीही केले नाही. काँग्रेसनेच बाबासाहेबांचा अनेकदा अपमान करून त्यांना मंत्रीपदाचा राजीनामा देण्यास प्रवृत्त केले होते. बुद्धांचे पूजक असलेल्या मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने डॉ.बाबासाहेब अंबेडकरांचा फोटो संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये लावला, लंडन मधील बाबासाहेबांचे घर ताब्यात घेतले, इंदु मिलची जागा बाबासाहेबांच्या स्मारकासाठी दिल्याने तेथे दोन वर्षात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे राहणार आहे. त्यामुळे नागरिकांनी गैरसमज करून घेवू नये. बाबासाहेबांनी दिलेले संविधान मजबूत करण्याची शपथ मोदींनी घेतली आहे. या निवडणुकीत परदेशातून मोदींना मिळत असलेला प्रतिसाद पहाता नरेंद्र मोदींचा विजयाचा रथ एवढ्या ताकदीने पुढे चालला आहे की तो थांबवणे आता शक्य नाह. हा रथ जर कोणी अडवला तर त्याला आडवे केल्या शिवाय आम्ही रहाणार नाही, असे प्रतिपादन आरपीआयचे अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी करून नगर मधून महायुतीचे उमेदवार सुजय विखे यांनाच दलित व सर्व समाजांनी मतदान करून विजयी करावे, असे आवाहन त्यांनी केले.


महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत बोलताना केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले. सचिन जाधव, सुनील साळवे, वसंत लोढा, अनिल शिंदे, ज्ञानेश्वर काळे, जीत आठवले आदींसह महायुतीचे पदाधिकारी.

सुजय विखे यांच्या प्रचारार्थ मंत्री रामदास आठवले यांची शुक्रवारी सायंकाळी नगर मधील मंगलगेट येथे जाहीर सभा झाली. यावेळी माजी राज्यमंत्री राजकुमार बडोले, शिवसेनेचे प्रवक्ते राजू वाघमारे, संपर्क प्रमुख सचिन जाधव, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे, भाजपाचे वसंत लोढा, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, ज्ञानेश्वर काळे, जीत आठवले आदींसह पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

यावेळी मंत्री आठवले यांनी भाषणामधून आपल्या नेहमीच्या पद्धतीने चारोळ्या सादर करून विरोधकांवर निशाण साधला. ते म्हणाले, मला नको आहे तुमचा फुलांचा बुके... मला हवा आहे नगरचा खासदार म्हणून सुजय विखे..., देशात आहे नरेंद्र मोदींची अंधी... मग मला का मिळणार नाही मंत्री पदाची संधी..., यहाँ बात हो रही है सबको डरानेकि... हमारा मिशन है काँग्रेस को हरानेकी...., माझ्या हातात नेहमीच असतो झेंडा निळा.... म्हणून विरोधकांच्या पोटात उठतो गोळा... या चारोळ्यांना उपस्थितांनी टाळ्या व शिट्ट्यांनी दाद दिली.

यावेळी राजकुमार बडोले म्हणाले, भारतीय संविधानाचा मूलभूत ढाचा बदलण्याचा कोणालाही अधिकार नाहीये. विरोधक याबाबत कांगावा करत दिशाभूल करत आहेत. भारतीय जनता पक्ष हा संविधानानुसार काम करणारा पक्ष आहे.

राजू वाघमारे यांनी देशाच्या व दलित समाजच्या प्रगतीसाठी केंद्रात पुन्हा मोदी सरकारचीच आवश्यकता आहे. त्यामुळे नगरमधून सुजय विखेंना विजयी करा असे आवाहन केले.

सुनील साळवे यांनी प्रास्ताविक केले. सचिन जाधव यांनी आभार मानले. यावेळी अश्विनी जाधव, किरण दाभाडे, विजय भांबळ, अजय साळवे, महेंद्र लोंढे, अमोल हुंबे, नितीन कसबेकर, अनिल गट्टानी, शिला खराडे, बंटी डापसे, रवी लालबोन्द्रे, सुनील उमाप, राहुल कांबळे, सुमित बटूळे, चंद्रकांत पाटोळे, विनोद भिंगारे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# शंभर टक्के मतदान घडवून आणा, पुढच्या पिढीचं भवितव्य घडवा, 'लोकशाही जिवंत ठेवा, मतदान करा व इतरांनाही प्रवृत्त करा'...

या पृथ्वीवर युगान युगं कोंबडा बिचारा पहाटेच उठून आपल्याला झोपेतून उठवायचा दररोज प्रयत्न करतोय.. दुर्दैवाने आपण त्याच कोंबड्याला कापून भ्रष्ट उमेदवारांनी दिलेल्या निवडणुकीतल्या मेजवान्या झोडतो, आयुष्यात जो कोणी आपल्याला झोपेतून उठवायचा प्रयत्न करतो तोच आपल्याला नको असतो, यातून आपण जणू काही हेच सिद्ध करतो की आम्ही काही या धुंदी काळझोपेतून जागे होणार नाही, त्याच तिकिटावर तोच खेळ, भ्रष्ट डोंबाऱ्यांचा खेळ, तिच माणसं, तिच आश्वासनं, तोच खेळ खंडोबा आणि ज्यांच्यासाठी आपण अहोरात्र मरमर करतो, त्या आपल्या पुढच्या पिढीची वाताहत आपण घडवतो, आपल्या हाताने केवळ आणि केवळ देशाचा लोकशाहीचा आणि भविष्याचा विचार न करता योग्य उमेदवाराला मतदानच न करता करून घेतो, याची जाणीव ज्या दिवशी होईल तो दिवस खरा लोकशाहीत सुवर्ण अक्षरांनी लिहावा.

आता योग्य उमेदवार कोण हा ज्याच्या त्याच्या सद्सदविवेक बुद्धीच्या आवाक्याचा प्रश्न आहे. केवळ आपल्या जातीधर्मांचा आहे म्हणून, किंवा केवळ पाहुण्याचा मेव्हणा आणि मेहुण्याचा पाहुणा आहे म्हणून, किंवा तो त्याच्या ताटातला एक तुकडा आपल्याला चघळायला फेकत असतो म्हणून, किंवा आपले टेंडर किंवा आपल्या हातातल्या संस्था जाऊ नयेत म्हणून मतदान करणारे आणि घडवून आणणारे बरेच लाभार्थी आहेत.

परंतु या देशातल्या लोकशाहीचा एक मात्र प्रखर प्रभावी उपाय म्हणजे मला दिलेला मतदानाचा अधिकार, ज्याच्या आधारे मी भविष्य व परिस्थिती बदलवू शकतो. क्षणिक लोभाला बळी न पडता, माझा पुरुषार्थ मी पार पाडू शकतो, तरच मी मतदान करून निवडून दिलेल्या उमेदवाराला ताठ मानेने सर्वांच्या समक्ष समस्यांचा जाब विचारू शकतो, याची जाणिवच नसल्यामुळे, या शनिवार, रविवार जोडून आलेल्या मतदानाच्या सुट्ट्या ट्रीपला जाऊन किंवा घरातच टीव्ही बघत लोळत पडून घरातच बडबड करण्यात घालवणारे महाभाग खऱ्या अर्थाने या देशाचे भवितव्य बिघडवत आहेत असेच म्हणावे लागेल, या महिन्यात मतदानाची निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यापासून आतापर्यंत देशात कुठेच सरासरी ६० टक्क्याच्या पुढे मतदान गेलेले नाही.. मग प्रश्न असा पडतो की १०० पैकी ६० जणच जर मतदान करतात तर उरलेले ४० जण मतदानाच्या दिवशी नेमकं कुठे जातात?




निकाल जाहीर होताना मग त्या एकूण १०० मतदारांपैकी प्रत्यक्ष मतदान केलेल्या फक्त साठ जणांमध्येच मतांची विभागणी अशी होते की फक्त पंधरा किंवा वीस मते पडणारा प्रचंड बहुमताने निवडून आला असे जाहीर होते, आणि मग तोच आपल्यावर राज्य करतो, ती जी मतदानच न करणारी निष्क्रिय चाळीस माणसं आहेत, त्यांनी उमेदवारांकडून मतदानासाठी म्हणून कदाचित दोन दिवस देखील पुरणार नाहीत अशा पैशाची अपेक्षा केलेली असते, किंवा त्यांना देशाच्या भवितव्याचा तर प्रश्न दूरच राहिला स्वतःच्या भविष्याची देखील चिंता नसते.. याला कारण म्हणजे त्यांचा मेंदूच बथ्थड झालेला आहे. या निष्क्रिय लोकांचा मेंदू चायनीज खाऊन खाऊन चायनीज झाला असावा युज अँड थ्रो नो गॅरंटी नो वॉरंटी.. आपण जर सूज्ञ असाल आपली सद्सदविवेक बुद्धी जागृत असेल, तर मतदान करणे म्हणजे तिसरं महायुद्ध खेळण्याइतकी अवघड गोष्ट निश्चित नसून फक्त घरातून नेहमी प्रमाणे बाहेर पडणे गरजेचे आहे, तेव्हा विचार करा आणि शंभर टक्के मतदान घडवून आणा, पुढच्या पिढीचं भवितव्यं घडवा, लोकशाही जिवंत ठेवा मतदान करा.. व इतरांनाही करायला प्रवृत्त करा.

– **सुहास मुळे**, अध्यक्ष, जागरूक नागरिक मंच. ९८२३७२२२१२



स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्यावतीने भाळवणी (ता. पारनेर) येथील गुरुकुल कुस्ती संकुलात आयोजित मतदार जागृती अभियानात सहभागी झालेले कुस्तीपटू. समवेत पै. गणेश जाधव, पै. संदीप डोंगरे आदी.

# कुस्ती संकुलात मतदार जागृती

## कुस्तीपटू कुटुंबातील सर्व सदस्यांकडे धरणार मतदानाचा आग्रह

नगर – स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने भाळवणी (ता. पारनेर) येथील गुरुकुल कुस्ती संकुलात मतदार जागृती अभियान राबविण्यात आले. यावेळी कुस्तीपटूंना कुटुंबातील सर्व सदस्यांना मतदानाचा आग्रह करण्याचे आवाहन करण्यात आले. कुस्तीपटूंनी कुटुंबातील सर्व सदस्यांना मतदानाचा हक्क बजाविण्यास लावणार असल्याचा संकल्प केला.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धराम सालीमठ यांच्या निर्देशानुसार हा उपक्रम राबविण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी प्रगल्भ लोकशाहीसाठी घरच्या मंडळींना मतदानासाठी आग्रह धरण्याचा व त्यांच्याकडून मतदानाचा हक्क बजावण्यासंदर्भात कुस्तीपटूंना शपथ दिली. यावेळी आंतरराष्ट्रीय कुस्तीपंच पै. गणेश जाधव, युवा मंडळाचे अध्यक्ष पै.संदीप डोंगरे आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आई–बाबा, आजी–आजोबा व कुटुंबातील सदस्यांना मतदान करण्यासाठी आग्रह करणार असल्याचा संकल्प केला. जना मनाची पुकार आहे, मतदान आमचा अधिकार..., घरोघरी साक्षरता घेऊन जाऊ, मतदात्यांना जागरुक बनवू... अशा विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या. यावेळी कुस्तीपटूंना मतदार माहिती पुस्तीकाचे वाटप करण्यात आले.

पै.नाना डोंगरे म्हणाले की, शंभर टक्के मतदान झाल्यास योग्य उमेदवार निवडून येणार आहे. नागरिकांचा मतदान प्रक्रियेत पूर्णतः सहभाग वाढल्यास लोकशाही बळकट होणार आहे. लोकशाही सदृढ होण्यासाठी युवकांसह प्रत्येक नागरिकांचा मतदान प्रक्रियेत सहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी नेहरु युवा केंद्राचे उपनिदेशक शिवाजी खरात, जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिघे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अशोक गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# ज्यांना गरिबीची झळच बसली नाही, त्यांना गरिबांचे दुःख काय समजणार

## आ. निलेश लंके यांचे प्रतिपादन; रामवाडी झोपडपट्टीवासियांशी साधला संवाद, शहरातील झोपडपट्ट्यांचा चेहरामोहरा बदलण्याचे आश्वासन

नगर – गरिबी काय असते?, सर्वसामान्यांचे दुःख काय असतात? ते दुःख जाणणारा मी कार्यकर्ता आहे. गरीबी पाहिली, त्याचे चटके सोसले. मात्र ज्यांना गरीबिची झळच बसली नाही, त्यांना गरिबांचे दुःख काय समजणार. गरिबांच्या मतांवर निवडून येऊन पुन्हा पाच वर्ष तोंड दाखवायचे नाही. त्यांना सत्ता फक्त मोठेपणा मिरवण्यासाठी हवी आहे, मात्र या सत्तेचा वापर सर्वसामान्य व गरिबांचे आश्रू पुसण्यासाठी करणार असल्याची भावना महाविकास आघाडी दक्षिण लोकसभेचे उमेदवार निलेश लंके यांनी केले.



रामवाडी झोपडपट्टीत प्रचार सभेत बोलताना महाविकास आघाडीचे दक्षिण लोकसभेचे उमेदवार निलेश लंके. समवेत दादाभाऊ कळमकर, अभिषेक कळमकर, किरण काळे, भाऊसाहेब उडाणशिवे, साजिद काझी, श्रीरंग अडागळे आदी.

श्री. लंके यांच्या प्रचारार्थ शहरातील रामवाडी झोपडपट्टी येथे झालेल्या सभेत ते बोलत होते. श्री. लंके यांनी थेट झोपडपट्टीवासियांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले. यावेळी माजी आमदार दादाभाऊ कळमकर, अभिषेक कळमकर, किरण काळे, माजी नगरसेवक भाऊसाहेब उडाणशिवे, विकास उडाणशिवे, साजिद काझी, श्रीरंग अडागळे आदी उपस्थित होते.

पुढे श्री. लंके म्हणाले की, खासदार म्हणून निवडून आल्यास शहरातील झोपडपट्ट्यांचा चेहरामोहरा बदलू. झोपडपट्टी धारकांचे नाव सातबारावर लावण्यासाठी विशेष प्रयत्न करणार आहे. कचरा वेचकांचे कल्याण मंडळ स्थापन करुन त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती, शिक्षण व त्यांचे जीवनमान उंचावण्याचे काम केले जाणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

प्रास्ताविकात भाऊसाहेब उडाणशिवे यांनी कोणताच उमेदवार खासदाराने आजपर्यंत झोपडपट्टीतील नागरिकांशी आस्थेने विचारपूस केली नाही. लंके हे पहिलेच उमेदवार असून, त्यांच्या पाठिशी सर्वसामान्य जनता उभी राहणार असल्याचे स्पष्ट केले.

दादाभाऊ कळमकर म्हणाले की, एकदाकी धनदांडगे उमेदवार निवडून आल्यास त्यांना गोरगरीबांच्या प्रश्नांची जाणीव राहत नाही. नोटा देऊन मते घेऊ, अशी त्यांची मानसिकता झाली आहे. मात्र सर्व नागरिक स्वाभिमानी असून, त्यांच्या पैश्यांना विकणारे नसल्याचे सांगितले. यावेळी अश्विन खुडे, विकास धाडगे, मनोहर चकाले, सोमनाथ लोखंडे, सचिन साळवे, सनी साबळे आदी उपस्थित होते.

# विकासकामांना नगरकरांचा पाठिंबा

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ बालिकाश्रम रोड परिसरात प्रचार फेरी

नगर – शहरामध्ये पक्षीय राजकारण बाजूला ठेवून विकास कामांना प्राधान्यक्रम देत नागरिकांचे एक–एक प्रश्न हाती घेऊन नियोजनबद्ध शहर विकासाची कामे मार्गी लावली आहे. त्यामुळे नगरकरांचा विकास कामांना पाठिंबा राहील. डॉ. सुजय विखे पाटील यांनी शहरातील विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मदत केली आहे. त्यामुळे विकास कामातून विकसित नगर निर्माण होत आहे. नगर–पुणे रेल्वे सेवेचे काम मार्गी लावण्यासाठी डॉ.सुजय विखे पाटील यांना पुन्हा एकदा संसदेमध्ये पाठवायचे आहे, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.



राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ बालिकाश्रम रोड परिसरात प्रचारार्थ फेरीत सहभागी झालेले आ. संग्राम जगताप, संपत बारस्कर, धनश्री विखे पाटील. (छाया – लहू दळवी)

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ बालिकाश्रम रोड परिसरात प्रचार फेरी झाली. यावेळी आ.संग्राम जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, धनश्री विखे पाटील, राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या शहर जिल्हाध्यक्ष रेश्माताई आठरे, अविनाश घुले, दगडू पवार, प्रा. माणिकराव विधाते, अभिजीत खोसे, प्रा.अरविंद शिंदे, डॉ.रणजीत सत्रे, वंदना ताठे, विलास ताठे, अजय दिघे, सचिन जगताप, अजिंक्य बोरकर, दीपक खेडकर आदी उपस्थित होते.

संपत बारस्कर म्हणाले की, लोकसभा निवडणूक निमित्त डॉ.सुजय विखे पाटील यांच्या प्रचारार्थ बालिकाश्रम रोड, भुतकरवाडी, भिंगारदिवे मळा, ताठे मळा या परिसरामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने रॅली काढत नागरिकांशी संवाद साधला आहे. यावेळी नागरिक उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत होते.

आ.संग्राम जगताप यांनी शहरांमध्ये नागरिकांच्या सुख–दुःखाबरोबरच विकासाची कामे मार्गी लावली असल्यामुळे नागरिक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बरोबर आहे. लोकसभा निवडणुकीमध्ये सुजय विखे पाटील यांना नगर शहरात मोठे मताधिक्क्य मिळणार आहे असे ते म्हणाले.

प्रचार फेरी दरम्यान ठिकठिकाणी महिलांच्या वतीने उत्साहात आ.संग्राम जगताप व धनश्री विखे पाटील यांचे स्वागत करत औक्षण केले जात होते. नागरिकांचा उत्साह पाहता नगरकर विकासाच्या कामाबरोबर राहतील असे मत शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी व्यक्त केले.

नगर शहर विकास कामातून झपाट्याने बदलत असून महानगराकडे घेऊन जाण्यासाठी डॉ. सुजय विखे पाटील यांना पुन्हा एकदा लोकसभेत पाठवायचे आहे केंद्र सरकारच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत घेऊन जाण्याचे काम केले जाणार आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठीची वयोश्री योजना यशस्वीपणे राबवली आहे. याचबरोबर लिंक रोडचे काम मार्गी लावले असल्यामुळे शहर विस्तारीकरणाला चालना मिळणार आहे, अशी माहिती धनश्री विखे पाटील यांनी दिली.

# मनोज जरांगे पाटलांच्या 'त्या वक्तव्या'ने राज्यात सत्ताधारी पक्षांना 'धडकी' भरली

## कानाकोपऱ्यात 'जरांगे डिचू कावा' पोहोचला; लोकभज्ञाक चळवळीचे स्पष्टीकरण



नगर – ज्यांना मराठ्यांनी सत्ता दिली, त्यांनी मराठ्यांना आरक्षण मिळवून देण्यासाठी आणि त्यांना आर्थिक, सामाजिक न्याय देण्याच्याकामी अडथळे आणले. अशा पुढाऱ्यांना असे पाडा की, त्यांच्या पाच पिढ्यात कोणीही उभे राहणार नाही. जरांगे यांच्या या वक्तव्याने संपूर्ण राज्यात सत्ताधारी पक्षांना धडकी भरली असून, संपूर्ण राज्याच्या कानाकोपऱ्यात जरांगे डिचू कावा पोहोचला असल्याचे लोकभज्ञाक चळवळीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

ओबीसी समाजामध्ये मराठ्यांना सहभागी करावे, अशी प्रमुख मागणी घेऊन महाराष्ट्रात उभे राहिलेल्या आंदोलनाचा वनवा पेटला. परंतु सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी मनोज जरांगे यांना व मराठा आंदोलकांना खेळवत ठेवले. संपूर्ण महाराष्ट्रातील जनतेला फार मोठी संधी मिळालेली आहे, यातून मोठा संदेश देणे अत्यंत आवश्यक असल्याचे म्हंटले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी कावा आणि डिचू कावा या दोन तंत्राचा वापर करून स्वराज्याची स्थापना केली. त्यांचा आदर्श समोर ठेऊन जरांगे यांनी हातात घेतलेला डिचू कावा तंत्र संपूर्ण राज्यात पोहोचला आहे. अहमदनगर दक्षिण मतदार संघात विखे यांना देखील जरांगे डिचू काव्याचा परिणाम भोगावा लागणार आहे. राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस आणि मुख्यमंत्री शिंदे यांना पाठीशी घालून मराठा आंदोलन मुसद्दीगिरीने मोडीत काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दक्षिण मतदार संघात विखे कुटुंबाला जरांगे डिचू काव्याची भीती निर्माण झाली आहे. मराठा समाज ओबीसी मधील लोकांपेक्षा देखील आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या आहे. त्यामुळे या समाजाचे न्याय मागण्या गेल्या अनेक वर्ष सत्तेवर असलेल्या पुढाऱ्यांनी डावलल्या. त्यामुळे त्यांना कायमचा धडा शिकवला पाहिजे, असे या डिचू काव्यातून संदेश गेला असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

लोकभज्ञाक चळवळीचे ॲड. अनिल सरोदे, ॲड. संदीप वांढेकर, ॲड. बाळासाहेब पवार, ॲड. गवळी, ॲड. सुरेश लगड, अशोक सब्बन, ओम कदम, शाहीर कान्हू सुंबे, प्रकाश थोरात आदी कार्यकर्त्यांनी जरांगे डिचू कावा राज्यात व्यापक करण्यासाठी प्रयत्न सुरु ठेवले आहेत. लोकांची भक्ती, लोकांचे प्रश्नांचे ज्ञान आणि लोकांचे प्रश्न खऱ्या अर्थाने सोडविण्याचे कार्य त्यातून देशातील संसदीय लोकशाहीचे रूपांतर लोकभज्ञाक संसदीय लोकशाहीमध्ये होऊ शकणार असल्याचे जारी करण्यात आले आहे.

# निमगाव वाघात आरोग्य तपासणी शिबिरात मतदार जागृती

## तपासणीला आलेल्या ग्रामस्थांनी केला मतदानाचा संकल्प



निमगाव वाघा येथे आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात ग्रामस्थांनी आरोग्य तपासणीनंतर मतदार जागृती अभियान राबविले. शिबिरात रुग्णांची तपासणी करताना डॉक्टर्स.

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे स्नेहालय संचलित केअरिंग फ्रेंड्स हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटरच्या वतीने स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. गावातील ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करुन मतदार जागृती अभियान देखील राबविण्यात आले. शिबिरार्थींना मतदानाचे कर्तव्य बजावण्याची शपथ देण्यात आली. या शिबिरास पंचक्रोशीतील ग्रामस्थांचा प्रतिसाद लाभला.

या शिबिराचे उद्घाटन डोंगरे संस्था तथा वाचनालयाचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते झाले. यावेळी एकता फाऊंडेशनचे अध्यक्ष अतुल फलके, वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्चना लांडे, प्रशासकीय अधिकारी अजिंक्य भिंगारदिवे, मंगेश बर्डे, गौरी लोणारे, लॅब टेक्निशियन वैशाली पंडोरे, परिचारिका हेमा धारवाडकर, कृष्णा शेलार आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, तणावपूर्ण जीवनशैलीमुळे मनुष्याचे आरोग्याचे प्रश्न गंभीर बनले आहे. विविध आरोग्य शिबिर गरजूंसाठी आधार ठरत आहे. गंभीर आजारांना सामोरे जाण्यापेक्षा वेळीच तपासणी करुन त्याचे निदान करणे आरोग्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागात आरोग्याबद्दल जागृती नसल्याने परिस्थिती अभावी ग्रामस्थ वेळोवेळी तपासणी करु शकत नाही, शिबिराच्या माध्यमातून त्यांचे आरोग्य जपण्याचे काम केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

गावातील नवनाथ मंदिराच्या सभामंडपात झालेल्या शिबिरात ग्रामस्थांची नेत्र तपासणी, दंतरोग तपासणी व कान, नाक, घसा तपासणी करण्यात आली. तसेच ज्येष्ठ नागरिकांचा रक्तदाब, मधुमेह, हिमोग्लोबीनची तपासणी करण्यात आली. मोतिबिंदू असलेल्या रुग्णांवर हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया होणार आहे. तसेच यावेळी गरजू रुग्णांना मोफत औषधाचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थांना कोणत्याही अमिषाला बळी न पडता, निर्भय व धर्मनिरपेक्षपणे मतदान करुन मतदानाचा हक्क बजावण्याचा व लोकशाही सक्षम करण्याचे आवाहन करण्यात आले. आभार युवा मंडळाचे अध्यक्ष संदिप डोंगरे यांनी मानले.

या उपक्रमासाठी नेहरु युवा केंद्राचे उपनिदेशक शिवाजी खरात, जिल्हा क्रीडा अधिकारी दिलीप दिघे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अशोक गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# निरामय

## वारंवार खाज येते, सावध व्हा!

आरोग्य विशेष

बहुतेक त्वचारोगांमध्ये काही आजारांच्या पाऊलखुणा दिसत असतात. एखादी पुळी, घाव दिसतो, एखादा व्रण दिसतो; परंतु असेही काही आजार आहेत, की त्या आजारांमध्ये त्वचेला बऱ्यापैकी खाज येत असते; पण त्वचेवर त्याची लक्षणे दिसत नाही. डॉक्टर तपासणी करतात; पण रुग्णाच्या अंगावर खाजवल्याचे नखांचे ओरखडे सोडल्यास बाकी काहीच चिन्हे दिसत नाही. एखाद्याला खरूज असेल तर त्याच्या हाताच्या बेचक्यात, काखेमध्ये, पाठी-पोटावर, नितंबांवर आणि जननेंद्रियांवर लालट खाजऱ्या पुळ्या येतात.



एखाद्याला नायटा असेल तर त्याच्या जांघांमध्ये, नितंबांवर, कमरेला आणि अंगावर इतरत्रही गोल गोल खाजरे चट्टे येतात. सोरियासिसचा आजार असेल तर अंगावर अभ्रकासारखे पापुद्रे असणारे लालट चट्टे येतात. ९० ते ९५ टक्के त्वचारोगांमध्ये अंगावर आजाराचा काही ना काहीतरी पुरावा सापडतो; पण त्वचारोगतज्ज्ञांच्या दवाखान्यात जाणाऱ्या रुग्णांपैकी साधारण पाच टक्के रुग्णांना अंगावर कोणतेही पुरळ नसते; पण अंगाला खाज मात्र बऱ्यापैकी येत असते, अशा वेळी सर्व तपासण्या करून घेतल्या पाहिजेत.


## पुरुषांमधला स्तन कॅन्सर

व्याधी विचार

स्तनांच्या कर्करोगाचा संबंध कायमच महिलांशी जोडला जातो. हा विकार फक्त महिलांनाच होतो, असा सर्वसाधारण समज. अंडाशयाचा तसंच गर्भाशयाचा कॅन्सर फक्त महिलांनाच होतो कारण पुरूषांना हे अवयवच नसतात. पण पुरूषांनाही स्तनांचा कर्करोग होऊ शकतो. पुरूषांमधल्या आणि महिलांमधल्या स्तनांच्या कर्करोगात काही मूलभूत फरक असतात. पुरूषांमधल्या स्तनांच्या कर्करोगाविषयी जाणून घेऊ या. पुरूषांना होणारा स्तनांचा कर्करोग दुर्मीळ प्रकारात मोडतो. कोणत्याही वयातल्या पुरूषांना हा विकार होऊ शकतो. स्तनांचा कॅन्सर झालेल्या पाचपैकी एका पुरूषाच्या घरात स्तनांच्या कॅन्सरचा इतिहास असतो. म्हणजे वडील, भाऊ आदींना स्तनांचा कॅन्सर झालेला असू शकतो.

**लक्षणं**

स्तनांमधली गाठ हे स्तनांच्या कॅन्सरचं सर्वसाधारण लक्षण मानलं जातं. पण पुरूष याकडे फारशा गांभीर्याने पहात नाहीत. स्तनांमधली गाठ दुखरी नसल्याने त्याकडे दुर्लक्ष करण्याचं प्रमाण जास्त असतं. खालच्या दिशेला वळलेली स्तनाग्र हे सुद्धा पुरूषांमधल्या स्तनांच्या कॅन्सरचं लक्षण असू शकतं. कॅन्सरग्रस्त पेशी स्तनांवरच्या अस्थिबंधनाला आपल्या बाजूला खेचून घेतात. यामुळे स्तनाग्र खालच्या बाजूला वळलेली, कोरडी तसंच शुष्क होऊ शकतात. स्तनांमधून स्रवणारा द्रव हे सुद्धा स्तनांच्या कर्करोगाचं लक्षण असू शकतं. कर्करोगाच्या गाठींमुळे स्तनांमध्ये द्रवपदार्थ साठतात आणि स्तनाग्रांमधून ते बाहेर पडू शकतात. स्तनांवरची उघडी जखमही या कर्करोगाकडे अंगुलीनिर्देश करू शकते. कर्करोगाच्या




**स्तनांच्या कर्करोगाचा संबंध कायमच महिलांशी जोडला जातो. हा विकार फक्त महिलांनाच होतो, असा सर्वसाधारण समज. अंडाशयाचा तसंच गर्भाशयाचा कॅन्सर फक्त महिलांनाच होतो. कारण पुरूषांना हे अवयवच नसतात. पण पुरूषांनाही स्तनांचा कर्करोग होऊ शकतो.**

गाठी त्वचेच्या आत गेल्याचंही हे लक्षण असू शकतं. पुरूषांच्या स्तनांमध्ये टिश्यूंचं प्रमाण कमी असल्याने असं होतं. कर्करोग शरीरात पसरला तर स्तनांमधल्या वेदना, हाडांमधल्या वेदना, स्तनांजवळच्या ग्रंथी सुजणं अशी लक्षणं दिसू शकतात.

**उपचार**

शस्त्रक्रिया हा पुरूषांच्या स्तनांच्या कर्करोगावरच्या उपचारांचा पहिला पर्याय आहे. या शस्त्रक्रियेत संपूर्ण स्तन काढून टाकला जातो. तसंच दंडातल्या ग्रंथीही काढून टाकल्या जातात. यामुळे कर्करोग शरीरात पसरत नाही. एस्ट्रोजन हार्मोन थेरेपी या उपचारपद्धतीचाही अवलंब केला जातो. काही प्रकरणांमध्ये कर्करोगग्रस्त पेशींवर, त्यांच्या भिंतींवर एस्ट्रोजन रिसेप्टर्सचं अस्तित्त्व असतं. अशा परिस्थितीत एस्ट्रोजनमुळे पेशी विभागतात आणि त्यांची वाढ होते. हार्मोन थेरपीमुळे एस्ट्रोजनच्या प्रभावावर परिणाम होतो आणि वाढीचं प्रमाण मंदावतं. कर्करोगग्रस्त पेशींवर रिसेप्टर्स नसतील तर हार्मोन थेरेपीचा काहीच उपायोग होत नाही. अशा परिस्थितीत केमोथेरेपीद्वारे उपचार केले जातात.

**प्रतिबंध**

कर्करोगाचं वेळेत निदान हाच याचा प्रतिबंध आहे. घरात पुरूषांच्या स्तनांच्या कॅन्सरचा इतिहास असेल तर स्तनांची नियमित तपासणी हा प्रतिबंधात्मक उपाय ठरू शकतो. यासोबतच आरोग्यदायी जीवनशैलीचा अवलंब, नियमित व्यायाम, पोषक आहार यामुळे पुरूषांमधल्या स्तनांच्या कॅन्सरला आळा बसू शकतो.

नवसंशोधन

### अपुरी झोप ठरू शकते घातक!

अवघ्या सहा तासांची अपुरी झोप किंवा एका रात्रीचं जागरण यकृताच्या साखरनिर्मितीच्या प्रक्रियेवर तसंच इन्सुलिनच्या प्रक्रियेवर परिणाम करू शकतं. यामुळे चयापचय क्रियेशी संबंधित फॅटी लिव्हर तसंच मधुमेहाचा धोका अनेकपटींनी वाढू शकतो, असं एका संशोधनातून समोर आलं आहे. जपानमधल्या तोहो विद्यापीठात



याबाबतचं संशोधन करण्यात आलं. पण ग्लुकोज इनटॉलरन्सचा संबंध आहारातले बदल, ऊर्जा खर्च होणं किंवा अपुरी झोप यापैकी नेमका कशाशी आहे हे स्पष्टपणे सांगता येत नसल्याचंही या शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. उंदरांवर याबाबतचं संशोधन करण्यात आलं. अपुरी झोप झालेल्या उंदरांमध्ये रक्तातल्या शर्करेचं प्रमाण खूप जास्त असल्याचं या संशोधनातून समोर आलं.

डोळ्यांचं आरोग्य

### कशी स्वच्छ करायची डोळ्यांमधली घाण?

सकाळी उठल्यानंतर डोळ्यांमध्ये घाण जमा झालेली असते. त्वचेच्या पेशी, डोळ्यांमधला चिकट स्त्राव, तेल आणि धूळ यांच्या एकत्रित परिणामामुळे अशी घाण जमा होते. ही घाण सतत तयार होत असते. पण आपण जागे असताना, पाण्याची सतत उघडझाप सुरू असताना त्याचा फार त्रास होत नाही. डोळ्यांच्या उघडझापेसोबतच ही घाणही स्वच्छ होत असते. पण झोपेत असताना ही घाण डोळ्यांमध्ये साचते. हवेशी संपर्क आल्याने ती घट्ट होते. ही घाण स्वच्छ करण्यासाठी कोमट पाण्याने तोंड धुवायला हवं. टॉवेल गरम पाण्यात बुडवून डोळे स्वच्छ करता येतील. ही घाण हाताने खरवडून काढण्याच्या प्रयत्नात डोळ्यांना जखम होऊ शकते. त्यामुळे ती योग्य पद्धतीने स्वच्छ करायला हवी.



दंतारोग्य

### काय सांगतात जबड्याच्या वेदना?

जबड्यांमध्ये होणाऱ्या वेदना ही दातांशी संबंधित सर्वसाधारण समस्या आहे. दातांच्या रचनेत झालेला बदल किंवा असमतोल याला कारणीभूत ठरू शकतो. दातांच्या नैसर्गिक रचनेत काही बदल झाला तर जबडा दुखू लागतो. समस्येची तीव्रता आणि त्याचं मूळ यावरून वेदनांचं स्वरूप ठरतं. कोणत्याही वयाच्या व्यक्तीला जबड्यामध्ये वेदना जाणवू शकतात. यामुळे स्पॉंडिलायसिसही होऊ शकतो. जबड्याच्या वेदनांकडे दुर्लक्ष न करता तातडीने उपचार करून घ्यायला हवेत.



आजीबाईंचा बटवा

### बटाट्याकडे दुर्लक्ष नको!

बटाटा हा घटक कायम दुर्लक्षित राहतो. गुणांपेक्षा बटाट्याच्या दोषांबद्दलच जास्त चर्चा होते. पण प्रत्यक्षात बटाटा खूपच लाभदायी आहे. बटाट्यात पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि कॅल्शियमसारखे घटक असतात. यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. बटाट्याच्या सेवनामुळे कॅन्सरची शक्यता अनेक पटींनी कमी होते. बटाट्यामुळे कोलेस्टेरॉलचं प्रमाणही कमी होतं. बटाट्यात फायबरचं प्रमाणही बरंच जास्त असतं. यामुळे रक्तातल्या कोलेस्टेरॉलचं प्रमाण घटू शकतं. बटाट्याच्या सेवनामुळे मेंदूचं आरोग्यही उत्तम राहतं. बटाट्यातल्या पोषक घटकांमुळे मेंदू सक्रिय राहतो.



## मॉस्किटो लिक्विडस् वापरताय?

आरोग्यसाक्षर व्हा

डास चावल्यामुळे अनेक आजारांची लागण होऊन आरोग्याला गंभीर धोका निर्माण होतो. डासांना दूर करण्यासाठी मॉस्किटो रिपेलेंट्स सर्रास वापरले जातात. हे लिक्विड्स वापरण्यासाठी सोयीस्कर आणि सर्वात किफायतशीर असल्यामुळे याचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. मॉस्किटो किलर लिक्विड किंवा कॉइलमुळे डासांपासून सुटका होते; पण त्याचा आरोग्यावर वाईट परिणाम होतो. मात्र मॉस्किटो रिपेलेंट्स आरोग्यासाठी अतिशय घातक असल्याचे एका संशोधनात समोर आले आहे. संशोधनानुसार, डास मारणारी कॉइल १०० सिगारेटच्या धुराइतकीच इतकी धोकादायक आहे. या कॉईलमधून पीएम २.५ इतका धूर निघतो. मॉस्किटो रिपेलेंट लिक्विडमध्येही काही अतिशय हानिकारक घटक असतात. हे घातक घटक श्वासोच्छवासासोबत शरीरात जाऊन श्वसन मार्गावर परिणाम करतात. यामुळे श्वसन मार्गासंबंधित आजार होण्याचा धोका संभवतो. डास मारणाऱ्या लिक्वीडमध्ये एलॅथ्रिन आणि एयरोसोल यांचे मिश्रण असते. तसेच बॉटलच्या एका बाजूने कार्बन इलेक्ट्रॉड रॉड असतो. मशीन सुरू केल्यावर तो रॉड गरम होतो. गरम हवेसोबत लिक्लिड वाफेच्या रुपाने बाहेर येते



आणि हवेद्वारे पसरते. हे हवेद्वारे शरीरामध्ये गेल्यावर घसादुखी आणि डोकेदुखी अशा समस्या उद्भवतात. काही लोक डासांपासून संरक्षण होण्यासाठी अंगावर क्रीमही लावतात. ही क्रीम आपल्याला डासांपासून वाचवू शकते; पण त्वचेवर त्याचे दुष्परिणाम होतात. डासांपासून सुटका मिळवण्यासाठी लावलेल्या या क्रीमचा त्वचेवर वाईट परिणाम होतो. या क्रिममध्ये आढळणाऱ्या रसायनांमुळे आपल्या त्वचेवर इन्फेक्शनही होऊ शकते. मॉस्किटो रिपेलेंट्समध्ये डीईईटी असते. हे त्वचेवर वापरण्यासाठी सुरक्षित असते; पण त्यामध्येही रसायने असतात. त्यांचा सतत वापर केल्यास त्वचेवर आणि शरीरावर गंभीर परिणाम होतो. हे लक्षात घेऊनच वापर करणे गरजेचे आहे.

## कोणता व्यायाम करायला हवा?

विचारा प्रश्न

माझ्या खांद्याला दुखापत झाली आहे. मी कोणत्या प्रकारचा व्यायाम करायला हवा?

**उत्तर:** तुमच्या खांद्याच्या दुखापतीच्या स्वरूपावर, दुखापतीला लोटलेल्या काळावर, तुम्ही घेतलेल्या उपचारांवर आणि तुमच्या सध्याच्या उद्दिष्टांवर याचं उत्तर अवलंबून आहे. व्यायाम करताना तुम्ही काही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. कोणत्याही व्यायामाची सुरूवात हळूवारपणे करा. यामुळे खांद्याला हालचालीची सवय होईल. खांद्याच्या हालचालीत सुधारणा होण्यासाठी तुम्ही एक महिन्याचा वेळ द्यायला हवा. शोल्डर प्रेसपासून सुरूवात करा. यावेळी कोणतंही वजन उचलू नका. पहिल्या आठवड्यात पाच शोल्डर प्रेस करा. पुढच्या आठवड्यात याचं प्रमाण दहा करा. मग १५ करा आणि त्यानंतर वीसवर या. त्यानंतर तुम्ही हलकं वजन उचलू शकता. पण वजन उचलताना खूप काळजी घेणं गरजेचं आहे. वेदना आणि अस्वस्थता जाणवली तर व्यायाम थांबवणं किंवा त्याचं प्रमाण कमी करणं यासारख्या उपाययोजना करायला हव्यात.



## ही औषधं घेताय का?

आपण कुठे चुकतो?

ऐकीव माहितीच्या आधारे किंवा कोणी तरी सांगितलं आहे म्हणून आपण काही औषधं घेतो. औषधं घेताना आपण डॉक्टरांचा सल्ला विचारत नाही. पण काही औषधांचे दुष्परिणाम असतात. इतकंच नाही, तर विशिष्ट प्रकारच्या औषधांमुळे व्यायाम करताना त्रास होऊ शकतो. व्यायामावर आणि तुमच्या सर्वांगिण आयुष्यावर त्याचे विपरित परिणाम होऊ शकतात. अशाच काही औषधांविषयी आपण जाणून घेऊ या.

✽ सिलेक्टिव्ह सेरोटोनिन रियुप्टेक इनहिबिटर हे औषध नैराश्य आणि काळजीच्या लक्षणांसाठी दिलं जातं. या श्रेणीतली औषधं घेणाऱ्या व्यक्तीला भोवळ आल्यासारखं वाटतं तसंच उर्जेची पातळी खालावते. अशा औषधांमुळे व्यायाम करताना तोंड कोरडं पडतं. तसंच खूप घाम येतो. हे टाळण्यासाठी तुम्ही सतत पाणी प्यायला हवं.

✽ बेंझोडायझेपाईन्स प्रकारची औषधं काळजी, चिंता तसंच एखाद्या गोष्टीची भीती वाटत असल्यास दिली जातात. या औषधांमुळे शांत वाटतं. ही औषधं घेतल्यानंतर दमल्यासारखं आणि गळल्यासारखं वाटतं.



यामुळे शारीरिक क्षमता कमी होते आणि व्यायाम करावासा वाटत नाही.

✽ झोपेच्या गोळ्याही व्यायाम करताना तापदायक ठरतात. अशा गोळ्यांमुळे सतत आळस येतो, झोप येते. यामुळे व्यायामाच्या क्षमतेवर परिणाम होतो.

✽ ॲलर्जीवर दिल्या जाणाऱ्या औषधांमुळेही थकवा आल्यासारखं वाटतं. या औषधांचा प्रभाव राहीपर्यंत तुम्हाला सतत झोप, कंटाळा आल्यासारखं वाटतं. अशा औषधांमुळे शरीराचं तापमान खूप वाढतं. यामुळे खूप घाम येतो. शरीरातलं पाण्याचं प्रमाण कमी होतं.

✽ बद्धकोष्ठतेवर दिली जाणारी औषधंही दुष्परिणाम करू शकतात. अशी औषधं घेऊन व्यायाम केला तर पोटात गोळे येऊ शकतात.

✽ स्टिम्युलंट्स मेंदूची क्षमता वाढवतात. या श्रेणीतल्या औषधांचे बरेच दुष्परिणाम असतात. या औषधांमुळे व्यायामाच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. हृदयाची धडधड वाढणं, रक्तदाब वाढणं अशा समस्या यामुळे निर्माण होऊ शकतात.

✽ सर्दी, चोंदलेलं नाक यावर दिली जाणारी औषधंही दुष्परिणाम करू शकतात. अशा औषधांमुळे हृदयगती, रक्तदाब वाढणं अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

## काळजी घ्या कांजिण्यांचा संसर्ग वाढतोय

व्याधी चर्चा

बदलते हवामान आणि वाढत्या तापमानामुळे कांजिण्या संसर्गजन्य आजाराची प्रकरणे देशात वाढत आहेत. आरोग्य मंत्रालयाने कांजण्यांपासून सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला आहे. तापमान वाढले की, या रोगाचा धोका वाढतो. हा एक संसर्गजन्य रोग आहे, ज्यामध्ये संक्रमित व्यक्तीच्या अंगावर पुरळ उठून ताप आणि इतर अनेक प्रकारच्या गुंतागुंती होऊ शकतात. कांजिण्यांसोबतच काही राज्यांमध्ये गोवर आणि गालगुंडाचे प्रमाणही वाढले आहे. अनेक शहरांमध्ये गोवरचे रुग्ण वाढत आहेत. अनेक दवाखान्यांमध्ये फुगलेले गाल आणि सुजलेल्या जबड्यांसह अनेक मुले दिसत आहेत. या संसर्गजन्य आजारांचा मुलांवर सर्वाधिक परिणाम होत आहे. म्हणूनच, पालकांनी प्रतिबंधात्मक उपाय करत राहणे महत्त्वाचे आहे जेणेकरून मुलांमधील या संसर्गजन्य रोगांचा धोका कमी करता येईल.

कांजिण्या व्हॅरिसेला-झोस्टर नावाच्या विषाणूमुळे होतो. संक्रमित व्यक्तीच्या शरीरावरील पुरळ थेट संपर्कात



आल्याने त्याचा प्रसार होण्याचा धोका असू शकतो. चिकनपॉक्सने ग्रस्त असलेल्या व्यक्तीला खोकला किंवा शिंक येते, तेव्हा हा संसर्ग पसरण्याचा धोकादेखील वाढू शकतो. याआधी कांजण्या झाल्या नाहीत किंवा कांजिण्यांसाठी लसीकरण केले नसणाऱ्यांना विषाणूचा संसर्ग होण्याचा धोका जास्त असतो. कांजिण्या होऊन गेलेल्या लोकांमध्ये अँटिबॉडिज तयार झाल्यानंतर धोका कमी असतो; पण काही लोकांना एकापेक्षा जास्त वेळादेखील कांजिण्या येऊ शकतात. गोवर हा देखील बालवयात होणारा संसर्ग आहे. गोवर झालेली व्यक्ती खोकते किंवा शिंकते, तेव्हा या आजाराचा प्रचार होण्याची शक्यता असते. गोवर होऊ नये यासाठी बालकांचे लसीकरण केल्यास त्याचा परिणाम कमी होतो. कोरोना महामारीमध्ये मोठ्या संख्येने बालकांना लसीकरण न केल्यामुळे आता हा संसर्गजन्य रोग वाढण्याचा धोका आहे.

कांजण्या, गोवर आणि गालगुंड रोखायचा असेल तर लसीकरण हा सर्वोत्तम मार्ग आहे. लहान मुले, किशोरवयीन आणि प्रौढांसह प्रत्येकाने कांजिण्यांच्या लसीचे दोन डोस घेतले पाहिजे. एमएमआर लस गोवर, कांजिण्या आणि गालगुंडापासून संरक्षण करण्यासाठी उपयुक्त आहे. संक्रमित लोकांपासून योग्य अंतर राखणे तसेच वेळोवेळी हात स्वच्छ धुतले पाहिजेत. यामुळेही या संसर्गाचा धोका कमी होतो.





गांधी मैदानातील श्री मार्कंडेय मंदिर सभामंडप भूमिपूजन प्रसंगी ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री. समवेत संगमनेथ महाराज, मनोज दुलम, श्रीनिवास बोज्ञा, गणेश विद्ये आदी.

# मी ज्या मंदिराचे भूमपूजन करतो त्याचे कलशारोहण होते

**ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री यांचे प्रतिपादन; श्री मार्कंडेय मंदिर सभामंडप भूमिपूजन**

नगर – अक्षय तृतीया दिवस हा हिंदू धर्मातील पवित्र दिवस असुन आजच्या मुहूर्तावर मंदिराचे जीर्णद्धाराचे नियोजन केले हे अध्यात्मिक दृष्टीने फार महत्वाचे आहे. मंदीर जीर्णोद्धार करणाऱ्या लोकांचे मी कौतुक करतो यांना सर्व देवीदेवतांचे आशीर्वाद प्राप्त होतील. आजपर्यंत मी ज्या ज्या मंदिराचे भूमिपूजन केले आहे त्या त्या मंदिराचे काम पूर्ण झालेले असुन मार्कंडेय मंदिराचेही काम येणाऱ्या दोन वर्षात पूर्ण होईल अशी मला आशा आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री यांनी केले.

पद्मशाली पंच कमिटी ज्ञाती समाज, श्री मार्कंडेय मंदिर देवस्थान व समस्त पद्मशाली समजाच्या वतीने गांधी मैदान महामुनी चौक येथे ८, ९ व १० मे रोजी मार्कंडेय मंदिर सभामंडप भूमिपूजन समारंभ झाले. यावेळी अध्यक्षस्थानी ह.भ.प. जंगले महाराज शास्त्री होते. याप्रसंगी ते बोलत होते.

प्रमुख उपस्थिती म्हणून श्री विशाल गणेश मंदिराचे पुजारी संगमनाथ महाराज, आ. संग्राम जगताप, नगरसेवक मनोज दुलम, भाजपचे वसंत लोढा, नगरसेवक बाळासाहेब बोराटे, बजरंग दलाचे कुणाल भंडारी, राष्ट्रीय सेवक संघाचे अनिल जोशी, विश्व हिंदू परिषदेचे अनील रासने उपस्थीत होते.

यावेळी आ. संग्राम जगताप यांनीही आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाले श्री मार्कंडेय मंदीर हे ऐतिहासिक मंदीर असुन या मंदिराचे काम पूर्ण झाले तर अहमदनगर शहराच्या वैभवात नक्कीच भर पडेल. या मंदिरा साठी व याच्या विकासासाठी आपण सर्व ते सहकार्य करेल असे आश्वासन दिले.

या वेळी वसंत लोढा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. गेल्या तीन दिवसाच्या भरगच्च कार्यक्रमास सुजय विखे, निलेश लंके, पका पाटील, अभय आगरकर, अभिषेक कळमकर, किरण काळे, संभाजी कदम, अप्पा नळकांडे, संदीप दातरंगे आदीनी मंदिरात येवून मार्कंडेय मूर्तीचे दर्शन घेतले.

प्रास्ताविक पद्मशाली समाजाचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा यांनी केले तर आभार सचिव अमित बूरा यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश बुरा यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री मार्कंडेय मंदिराचे अध्यक्ष गणेश विद्ये, शहर बँक संचालक दत्तात्रय रासकोंडा, शरद मडुर, लक्ष्मण बुरा, त्रीलेश येंनगंदूल, रवी दंडी, विनायक बोगा, पुरोहित ज्ञानेश्वर मंगलाराप, नल्ला महाराज, शुभम सुंकी, श्रीनिवास बुरगुल, अमित बुरा, पुरशोत्तम बुरा, ॲड. राजू गाली, संजय बाले, अभिजित चिप्पा, रितेश अनमल, इगे राजेंद्र, गिरीश चिट्टा, अमीत बिल्ला, जोग दत्तात्रय, कुमार आडेप, संजय वल्लाकट्टी, सागर सब्बन, ऋषिकेश गुंडला, विलास दिकोंडा व राजेंद्र बोगा आदींनी सहकार्य केले.

**संत निरंकारी मंडळातर्फे १३ मे रोजी**

# बाबा हरदेवसिंहजी यांच्या स्मृतीत ‘समर्पण दिवस’ समारोहाचे आयोजन




नगर – मानवता हाच खरा धर्म असून, धर्म जोडण्याचे काम करतो, तोडण्याचे नव्हे, अशी शिकवण देणारी दिव्यविभुती शांतीदूत बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या पावन स्मृतीप्रित्यर्थ संत निरंकारी मंडळाच्या वतीने १३ मे रोजी ‘समर्पण दिवस’ समारोहाचे आयोजन करण्यात आले असून, मुख्य कार्यक्रम संत निरंकारी आध्यात्मिक स्थल समालखा येथे सायंकाळी सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि राजपिता रमितजी यांच्या पावन उपस्थितीत होईल, त्यामध्ये मोठ्या संख्येने निरंकारी भक्तगण सहभागी होऊन बाबा हरदेव सिंहजींच्या प्रति आपली श्रद्धासुमने अर्पित करतील.

मंडळाच्या नगर शाखेच्यावतीने सुद्धा १३ मे रोजी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत मिस्किन रोड, नगर स्थित निरंकारी सत्संग भवन येथे सत्संग प्रवचनांचा कार्यक्रम आयोजित केला असून, नगर शहर व परिसरातील निरंकारी भक्तगण सहभागी होणार आहेत, अशी माहिती मंडळाचे नगर झोन प्रमुख हरिष खुबचंदानी यांनी दिली.

तसेच समर्पण दिवस निमित्त सत्संग समारोहाचे आयोजन नगर जिल्ह्यातील मंडळाच्या शाखा असलेल्या अनेक ठिकाणी व नगर झोन अंतर्गत बीड, परभणी, नांदेड व हिंगोली या ठिकाणी सत्संग कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

जगामध्ये शांतीसुखाचे वातावरण स्थापित करण्यासाठी युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी यांनी सद्भावपूर्ण एकत्व'', ''वसुधैव कुटुम्बकंम'' आणि''एकाला जाणा, एकाला माना, एक व्हा यांसारखे दिव्य संदेश दिले ज्यामध्ये नि:संशयपणे लोककल्याणाची भावना निहित आहे. याशिवाय त्यांनी परस्पर प्रेम आणि एकोप्याची भावना सदृढ करण्यासाठी भिंतीरहित विश्वची सुंदर संकल्पना मांडली व त्याला कृतीत उतरविले.

वर्तमानकाळात सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज युगद्रष्टा बाबा हरदेवसिंहजी यांचा हाच सत्य संदेश जनसामान्यांपर्यत पोचविण्यासाठी प्रयत्नशील आहे ज्यामधून निरंकारी मिशनचा प्रत्येक भक्त प्रेरणा घेत असून आपले जीवन सार्थक करत आहे.

# सविता रमेश फिरोदिया प्रशालेचा आरव रासकर ‘भारती विद्यापीठ गणित परिक्षेत’ राज्यात प्रथम



नगर – भारती विद्यापीठ, पुणे यांच्यामार्फत आयोजित इंग्रजी व गणित परिक्षा २०२४ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, त्यामध्ये नगर येथील सविता रमेश फिरोदिया प्रशालेचा इ.४ थीचा विद्यार्थी आरव संदिप रासकर हा राज्यात गणित विषयात पहिल्या क्रमांकाने गुणवत्ता यादीत चमकला आहे.

या परिक्षेत गणित व इंग्रजी विषय मिळून ३५६ विद्यार्थी सहभागी झाले होते, त्यापैकी २८८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रशालेचा ८१ टक्के निकाल लागला. या अगोदर चि.आरव हा प्रज्ञाशोध परिक्षेत राज्यात पाचवा आला आहे.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा म्हणाले, संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी सर्व सोयी–सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. शिक्षकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांकडून तयारी करुन घेण्यात येत आहे. विद्यार्थीही आपल्या मेहनतीने विविध राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय स्पर्धा, परिक्षेत चमकत संस्थेचे नाव उज्वल करत आहेत. चि. आरव याने मिळविलेले यश हे शाळेच्या लौकिकात भर घालणार असल्याचे सांगितले.

शिशु संगोपन संस्थेच्यावतीने चि.आरव रासकर याचा गौरव करण्यात आला. त्याच्या या यशाबद्दल त्याचे संस्थेचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा.चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र.धों.कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड.विजय मुनोत, सौ.रश्मी येवलेकर, ब.ना.नन्नवरे, मनसुखलाल पिपाडा, आर.एम.गुंदेचा, चंद्रकांत आनेचा, अभय गांधी, एल.के.आव्हाड, मुख्याध्यापिका सौ.योगिता गांधी व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

चि.आरव यास सौ.मनिषा कार्ले, सौ.मनिषा पालवे, सौ.जयश्री कोदे, मुख्याध्यापिका सौ.योगिता गांधी यांचे मार्गदर्शन लाभले.

त्याचा या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# संस्थेच्या प्रगतीत प्रशांत भंडारी यांच्या कुशल व्यवस्थापनाचे योगदान

**संतोष गांधी यांचे प्रतिपादन**



सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना चेअरमन संतोष गांधी.

**जैन ओसवाल पतसंस्थेचे सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार**

नगर – कोणत्याही आर्थिक संस्थेत शिस्तबध्द कारभार आणि खातेदार, ठेवीदारांना तत्पर सेवा महत्वाची असते. स्व.सुवालालजी गुंदेचा यांनी जैन ओसवाल पतसंस्थेत स्थापनेपासून शिस्तबध्दता आणली. त्यांच्याच मार्गदर्शनात तयार झालेले सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी संस्थेच्या स्थापनेपासून सर्वोत्तम पध्दतीने व्यवस्थापन सांभाळत आहेत. संचालक मंडळाच्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. आपल्या सर्व स्टाफला सोबत घेवून ते संस्थेचे आर्थिक व्यवस्थापन चांगल्या प्रकारे सांभाळत आहेत, असे उद्‌गार चेअरमन संतोष गांधी यांनी काढले.

सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे सरव्यवस्थापक प्रशांत भंडारी यांचा वाढदिवसानिमित्त संचालक मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी चेअरमन संतोष गांधी, व्हाईस चेअरमन समीर बोरा, ज्येष्ठ संचालक शांतीलाल गुगळे, चेतन भंडारी, विनय भांड, सौ.सोनाली प्रशांत भंडारी, मार्केटयार्ड शाखेचे व्यवस्थापक मनोज लुणिया, प्रमोद डागा, बाळू मुनोत, संजय बोरा, नयना बोगावत व सर्व कर्मचारी, मित्र परिवार उपस्थित होता.

शांतीलाल गुगळे म्हणाले, स्थापनेपासून प्रशांत भंडारी पतसंस्थेत आहेत. अतिशय प्रामाणिक व नियोजनपूर्वक काम करणे त्यांचे वैशिष्ट्ये आहे. पतसंस्थेच्या कामकाजात आधुनिकता आणण्यात त्यांनी नेहमीच योगदान दिले आहे. असे अधिकारी, कर्मचारी संस्थेच्या प्रगतीचे आधारस्तंभ असतात.

प्रशांत भंडारी म्हणाले, संस्थेच्या स्थापनेपासून मी याठिकाणी कार्यरत आहे. स्व.भाऊंचा सहवास व मार्गदर्शन मला मिळाले. आर्थिक व्यवहार सांभाळताना किती दक्ष राहिले पाहिजे, ग्राहकांना कशा पध्दतीने चांगली सेवा दिली पाहिजे अशा अनेक गोष्टी त्यांच्याकडून शिकायला मिळाल्या. त्यामुळेच संस्थेत आज सरव्यवस्थापक म्हणून काम करताना विशेष आनंद होतो. एका प्रतिष्ठित व नावाजलेल्या पतसंस्थेत अधिकारी असल्याचा नेहमीच अभिमान वाटतो. काम करताना सर्व संचालक मंडळाचे नेहमीच चांगले सहकार्य लाभते. आज वाढदिवसानिमित्त झालेला सत्कार मनस्वी आनंद देणारा आहे. शेवटी व्हा.चेअरमन समीर बोरा यांनी आभार मानले.



सावेडी उपनगरात गुलमोहोर रोडवर भगिनी निवेदिता सहकारी बँकेची १९ वी व नगरमधील पहिल्या शाखेचे उद्‌घाटन खातेदारांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षा सीए डॉ.रेवती पैठणकर, उपाध्यक्षा सीएमए डॉ. नेत्रा आपटे, माजी अध्यक्षा जयश्री कुरुंदवाडकर, मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता देशपांडे, संचालक व खातेदार. (छाया – विजय मते)

# आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत नगरकरांना सुविधा देणार

**डॉ. रेवती पैठणकर यांचे प्रतिपादन; सावेडीत गुलमोहोर रोडवर भगिनी निवेदिता सहकारी बँक शाखेचे उद्‌घाटन**

नगर – पुण्यासारख्या शहरात गेल्या ५१ वर्षांत सर्वस्तरातील लाखो व्यक्ती, उद्योग, संस्थांना आर्थिक पाठबळ देऊन सर्वांसाठी महिलांनी चालविलेली सहकारी बँक अशी ख्याती असलेली ‘भगिनी निवेदिता सहकारी बँक’ नगरकरांच्या सेवेत रुजू होत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करत डिजिटल बँकिंगच्या सुविधा नगरकरांना देणार, असे प्रतिपादन बँकेच्या अध्यक्ष सीए डॉ.रेवती पैठणकर यांनी केले.

सावेडी उपनगरात गुलमोहोर रोडवर भगिनी निवेदिता सहकारी बँकेची १९ वी व नगरमधील पहिल्या शाखेचे उद्‌घाटन खातेदारांच्या हस्ते फित कापून करण्यात आले. याप्रसंगी अध्यक्षा सीए डॉ. रेवती पैठणकर, उपाध्यक्षा सीएमए डॉ. नेत्रा आपटे, माजी अध्यक्षा जयश्री कुरुंदवाडकर, मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता देशपांडे व संचालक उपस्थित होते.

डॉ. नेत्रा आपटे म्हणाल्या, ‘महिलांनी सर्वांसाठी चालविलेली सहकारी बँक’ असे बिरूद मिरवणाऱ्या पुण्यातील भगिनी निवेदिता सहकारी बँकेची नवी शाखा अहमदनगर येथे सुरु झाली आहे. १९७४ मध्ये स्थापना झालेल्या पुण्यातील या अग्रेसर सहकारी बँकेने गेल्या ५१ वर्षांत चांगली सेवा देऊन ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळेच बँकेचा विस्तार होत आहे.

यावेळी स्मिता देशपांडे यांनी अहमदनगरमधील महिला, उद्योजक, नोकरदार, व्यावसायिकांनी शाखेला भेट देऊन येथील सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करुन आभार मानले. याप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या स्नेहमेळाव्यास अहमदनगर शहरातील व्यावसायिक, उद्योजक, नोकरदार व नागरिक उपस्थित होते.

# वीर शिरोमणी महाराणा प्रताप सिंह यांची जयंती साजरी

**राजपूत सेवा समितीतर्फे जयंतीनिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन**



राजपूत सेवा समितीच्या वतीने वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली. यावेळी समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

नगर – वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची ४८४ वी जयंती राजपूत सेवा समिती अहिल्यानगर तर्फे ९ मे रोजी उत्साहात विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. यावेळी शहरातील सर्व राजपूत समाज बांधव परिवारासह उपस्थित होते. सीताबन लॉन येथे झालेल्या महाराणा प्रतापसिंह जयंती सोहळ्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. समाजाप्रती आपलेही कर्तव्य आहे या भावनेतून हे शिबिर आयोजित केले होते. यावेळेस २५ जणांनी रक्तदान केले.

समाजातील विविध क्षेत्रात नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. पी. एस. आय. विनोद परदेशी यांच्या हस्ते हे सत्कार करण्यात आले. त्यात साजरी परदेशी (कॉर्फ बॉल गोल्ड मेडल) माही परदेशी (ॲथलेटिक) सृष्टी बायस व श्रेया बायस (बास्केटबॉल) तसेच पाचवी ते नववी मध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचाही सत्कार यावेळी समाजातील ज्येष्ठांच्या हस्ते करण्यात आला.

महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून तसेच दीपप्रज्वलन करून या कार्यक्रमाची सुरुवात समाजातील सर्व ज्येष्ठ व्यक्तींच्या हस्ते करण्यात आली.

यावेळी महाराणा प्रतापसिंह यांच्या शौर्याबद्दल पाहुण्यांनी विचार प्रगट केले.

१५ वर्षांनंतर प्रथमच राजपूत समाजातर्फे ही जयंती यावेळी मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाकरता राजपूत सेवा समितीच्या अहिल्यानगरच्या सर्व कार्यकर्त्यांनी मेहनत घेऊन या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले होते. कोणीही अध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकारी नसलेल्या या राजपूत सेवा समितीच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन हा कार्यक्रम केला. त्याबद्दल महाराष्ट्र व देशभरातील समाजातर्फे त्यांचे अभिनंदन होत आहे.



**अक्षय्यतृतीयेनिमित्त सावेडी स्थित चंदुकाका ज्वेल्समध्ये सोनेरी फायदा योजनेस प्रतिसाद**

अहमदनगरमधील सावेडी स्थित चंदुकाका ज्वेल्समध्ये अक्षय्यतृतीयेनिमित्त आयोजित सोनेरी फायदा या योजनेस ग्राहकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. ग्राहकांनी सुवर्णखरेदीचा मनसोक्त आनंद घेतला.

# भिंगारमधून मोपेडची चोरी; पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – भिंगार शहरातील छावणी परिषद कॉम्प्लेक्स मधील अरिहंत मोबाईल शॉपी समोर लावलेली होंडा कंपनीची एव्हीएटर मोपेड (क्र. एम.एच.१६ बी एल ९५२१) अज्ञात चोरट्याने गुरुवारी (दि.९) सकाळी ९ ते दुपारी २ या कालावधीत चोरून नेली आहे.

याबाबत अफरोज अक्रम खान (रा. मुकुंदनगर) यांनी शुक्रवारी (दि.१०) भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याच्या विरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# सावेडी ध्यान योगा केंद्रात अनुभवली सुदर्शन क्रिया



सावेडी येथील योगा ध्यान केंद्र येथे हॅपीनेस प्रोग्राम शिबिरात सुदर्शन क्रिया करून घेताना प्रशिक्षक सलील पुळेकर व साधक वर्ग.

नगर – आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री श्री रविशंकरची यांचे ६८ व्या वाढदिवसानिमित्त अहिल्यानगर शहरात सावेडी येथील योगा धान केंद्र येथे हॅपीनेस प्रोग्राम शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरासाठी बंगलोर आश्रम येथील आंतराराष्ट्रीय प्रशिक्षक सलील पुळेकर यांचे सहा दिवशीय शिबीरात उपस्थितांना अनमोल मार्गदर्शन मिळाले.

यामध्ये नगरचे प्रशिक्षक चंद्रकांत तागड, नरेंद्र बोठे, बीना हेगडे, संगिता पाचे, सुपर्णा देशमुख, सुनिता घाडगे, रोहिणी गवळी, रमाकांत गंगापूरकर, सुनिल कानडे, अपूर्वा गुजराथी, पूनम थोरात इ. अनेक प्रशिक्षकांनी यामध्ये सेवा योगदान दिले. या शिबीरात सुमारे १२५ पेक्षा जास्त लोकांनी आपल्या आरोग्यासाठी योगा अभ्यास, प्राणायम, मेडीटेशन आणि शारीरिक मानसिक स्वास्थासाठी, शरीराच्या शुद्धीसाठी सकाळी व संध्याकाळच्या सत्रामध्ये याठिकाणी श्री श्री रविशंकरजी यांचे मार्गदर्शनात सुदर्शन क्रिया साधनेचा अनुभव घेतला.

दैनंदिन जीवनात संघर्ष, ताण–तणाव, व्यसनमुक्तीसाठी तसेच आनंदी जीवनासाठी केलेले प्रयत्न, नैराश्य व चिंता या गोष्टी पासून निश्चित चांगल्या पद्धतीने जगण्याची कला अवगत झाली, अश्या प्रकारची प्रतिक्रया सर्वांनी दिली. शिबीरामध्ये दररोज होणाऱ्या ज्ञान चर्चानुसार आनंदी जीवनाची गुरुकिल्ली मिळाल्याचे आनंद व्यक्त केल्या.

अत्यंत उत्साही वातावरणात उपस्थित साधाकांनी या शिबीरामुळे त्यांना शारीरिक मानसिक स्तरावर अत्यंत लाभ झाला व जीवन जगण्याची कला अवगत झाली. सध्याच्या संघर्षमय धकाधकीच्या जीवन पद्धतीमुळे आलेला ताण–तणाव व त्याचबरोबर समाजातील आहारातील झालेल्या बदलामुळे शारिरीक व्याधी नवीन उत्पन्न झालेले आरोग्याविषयी व्याधी अश्या अनेक स्वास्थाच्या तक्रारींवर योग्य मार्गदर्शन मिळाले. विशेषतः जगभरात प्रसिद्ध असणारी श्वसनाच्या माध्यमातून प्राणावर नियंत्रण प्राप्त करणेसाठी प्रसिद्ध सुदर्शन क्रिया ही या कोर्समध्ये शिकवली जाते. विशेष शिबीराचे आयोजनासाठी नगर शहरातील आर्ट ऑफ लिव्हिंगचे सर्व प्रशिक्षक, प्रशिक्षकांनी आपले सेवा योगदान दिले.

सर्वांचे आरोग्य, जीवन सुखी–समृद्धी राहण्यासाठी शहराच्या सावेडी येथील आर्ट ऑफ लिव्हिंग ध्यान मंदिर, गावडे मळा येथे वारंवार अश्या शिबीराचे आयोजन केले जाते. याचठिकाणी १५ ते २१ मे आणि २१ ते २६ मे दरम्यान सकाळी ६ वा. पुन्हा हे शिबीर होत असून या शिबीराचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अहमदनगरचे प्रशिक्षक कृष्णा पेंडम यांचे वतीने करण्यात येत आहे. शिबीरासाठी ९४२२२२०८०४ या नंबरवर संपर्क करावे. १३ मे रोजी श्री श्री रविशंकरजी यांचे जन्मदिवस निमित्त तसेच हॅपिनेस प्रोग्राम सांगता निमित्त सकाळी आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्याच दिवशी सायंकाळी दिव्य भक्ती गीतांचा कार्यक्रम सत्संग उत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. कार्यक्रमास नागरिकांना आरोग्य शिबीर आणि आयोजीत कार्यक्रमास उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आर्ट ऑफ लिव्हिंग अहिल्यानगर परिवार यांनी केले आहे.

